गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रिज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँकेजवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.,अ.नगर
❖ ठेवीचे व्याजदर ❖
❖ ४६ ते ९० दिवस ........ ८%
❖ ९१ ते ३६५ दिवस ........ ९%
❖ १ वर्ष व त्यापुढे ........ १०%
❖ शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ........ ८४ महिने
❖ धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ........ ५ महिने मुदत
अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज
कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु.... १८ व्या वर्षी प्राप्त
दैनिक बचत (डेली कलेक्शन) / रिकरिंग (आर.डी.)/मुदत ठेव (एफ.डी.) साठी कमिशन एजंट नेमणे आहेत.
संस्थापक - श्री. अनिल मोहिते | अध्यक्ष - श्री. अजय मोहिते

रजि नं. ११४३९-५७/७७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०५.०२.२०२५ | अंक नं. २८४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे संतप्त शेतकऱ्यांचा महामार्गावर रास्ता रोको



वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ नगर – सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करताना शेतकरी.

नगर – वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतातील पिके जळू लागली असून, शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी वीज पुरवठा सुरळीत व्हावा, या मागणीसाठी ५ फेब्रुवारी रोजी सकाळी नगर तालुक्यातील दहीगाव येथे नगर – सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. यात रुईछत्तीसी गणातील १० ते १२ गावांमधील शेतकरी सहभागी झाले होते.

नगर तालुक्यातील रुईछत्तीसी गणातील दहिगाव, साकत, रुईछत्तीसी, वाटेफळ, शिराढोण, वडगाव तांदळी, तांदळी वडगाव यासह अन्य गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील गहू, कांदा, हरभरा या पिकांना पाणी असूनही देता येत नाही. परिणामी पाण्याअभावी पिके जळू लागली आहे. महावितरण शेतीसाठी ८ तास वीजपुरवठा करते मात्र या परिसरात ८ तासातील २ तासही विद्युत पुरवठा होत नाही. या संदर्भात या परिसरातील शेतकऱ्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले होते. मात्र महावितरण कंपनीने याची दखल न घेतल्यामुळे दहिगाव, साकत रुईछत्तीसी, वाटेफळ, शिराढोण, वडगाव तांदळी, तांदळी वडगाव या गावातील संतप्त शेतकऱ्यांनी ५ फेब्रुवारीला सकाळी ९.३० वाजता दहीगाव येथे नगर– सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. सुमारे एक तास सुरु असलेल्या आंदोलनामुळे नगर–सोलापूर महामार्गावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

यावेळी महावितरण कपंनीच्या अनागोंदी कारभारावर टिका केली. दोन दिवसात या भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्याचे असे लेखी आश्वासन महावितरण कंपनीच्या उपअभियंत्यांनी दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात माजी जिल्हा परीषद सदस्य बाळासाहेब हराळ, रमेश भांबरे, मधुकर म्हस्के, सुनिल म्हस्के, महेश म्हस्के, जयंत शिंदे, उध्दव अमृते, रवि अमृते, बाबा अमृते, बाळासाहेब बोठे, अनशाबापु म्हस्के, शिवहरी म्हस्के यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ सहभागी झाले होते. नगर तालुका पोलीस स्टेशनचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांनी यावेळी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता.

बंगला पाहिजे भाडेतत्वावर
स्वतंत्र बंगला (सर्व सोयींनीयुक्त)
1 BHK / 2 BHK
गुलमोहोर रोड ते एकविरा चौक, श्रीराम चौक भाडेतत्वावर पाहिजे (एजंट क्षमस्व)
7498107977

श्री वैष्णव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,अहिल्यानगर
नगर महाजनवाडी, श्री महाप्रभूजी मार्ग, जुना कापड बाजार, अहमदनगर-४१४००१
फोन : ०२४१-२४१५००९, Email Id : vaishnavpatsanstha@gmail.com
स्थलांतर
सर्व सभासद, खातेदार व ग्राहकांना कळविण्यात आनंद होत आहे की, आपल्या पतसंस्थेचे नूतन वास्तूमध्ये स्थलांतर होत आहे. सोमवार दि. १०/०२/२०२५ पासून पतसंस्थेचे दैनंदिन कामकाज खालील ठिकाणी चालू होईल, ही नम्र विनंती.
नूतन कार्यालयाचा पत्ता
पहिला मजला, सॉलीटेअर बिझनेस हॅब, जुन्या छाया टॉकीजसमोर, चितळेरोड, अहिल्यानगर-४१४००१, फोन : ०२४१-२४१५००९

बोअरची किंवा हौदावरची मोटर
खराब झाली आहे!
मग वाट कसली बघताय,
आजच अभय सेल्सशी संपर्क साधा..
❖ खात्रीशीर काम तेही योग्य दरात
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
9145008009 / 9822542011

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon,Ahilyanagar 414006
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली

पाचवे स्मृतिगंध
आमच्या जीवनाला सुंदर
आकार दिला तुम्ही,
असंख्य अशा ताऱ्यांना,
स्वत:चा प्रकाश दिला तुम्ही..
जीवनाचा प्रकाश देण्या..
दिवा अखंड जळतो,
आपणामुळे जीवनाचा अर्थ खरा
आपणांमुळे कळतो..
स्व. सुगंधीलालजी बोरा
१२ जुलै १९३८ – ६ फेब्रुवारी २०२०
।। विनम्र आदरांजली ।।
बोरा परिवार
मिरजगांवकर
पार्श्वनाथ कॉलनी, कोठी रोड, अ.नगर

।। ॐ द्रां दत्तात्रेयाय नम: ॐ ।। ।। ॐ नमो भगवते श्री शंकर सद्गुरु राया ।।
आदरणीय • भाऊना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
मुझे वहीं जानता है, जो खुदको समझता है।
श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री.राजाभाऊ कोठारी)
गुरूवार दि. ६ / २ / २०२५
सकाळी १०.०० वा - श्रींचा महाभिषेक
दुपारी १२.३० वा. - श्रींची महाआरती त्यानंतर महाराजांचे दर्शन सोहळा, महाप्रसाद व भजन, प्रवचन होईल.
सायं. ०६.३० वा. कै.श्री.कमलाकर काका तपस्वी यांचे पुतणे श्री.योगेश तपस्वी यांची भजन संध्या होईल. तरी सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.
टिप : कृपया पुष्पगुच्छ आणु नये त्यापेक्षा अन्नदान व वैद्यकीय सेवेत आपला सहभाग नोंदवावा !
रक्तदान ही जनसामान्यांची सेवा यालाच मानुया ईश्वरसेवा
भाऊंच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित केले आहे तरी मानवतेच्या भावनेतुन जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदात्यांनी रक्तदान करावे ! वेळ - १०.०० ते ४.००
मंगल भक्त सेवा मंडळ परिवार
मंगल दत्तक्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## माझे असतेपण लोपो । नामरूप हारपो ।।

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन


संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

संत व समाजसुधारक गाडगेबाबा एखाद्या खेड्यातच जायचे. गावाबाहेरच्या पडीक देवळात राहायचे. एकट्यानेच त्या मंदिराला स्वच्छ करायला घ्यायचे. गावात एकदाच भिक्षेला यायचे. मिळेल ते विनातक्रार खायचे. ८–१० दिवसांतच त्या मंदिराचे व त्या परिसराचे रूप पालटायचे. आता गावकऱ्यांच्या मनातले कुतुहल जागृत व्हायचे. ते जेव्हा बाबांच्या दर्शनाला जाणार, त्याच्या आदल्या रात्री गाडगेबाबा गाव सोडून बेपत्ता व्हायचे. परिश्रमयुक्त सद्‌भावाला अगदी मूर्त स्वरूपात गावाच्या बवाली करून...

यज्ञवृत्तीची ही संतमंडळी नावाकरता काही करतच नाही. ती म्हणतात, 'उपाधी' सोडा. विशेषणे, भूमिका, कर्तृत्व या सर्वांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न करा. म्हणजे आपोआप निरोगी आत्मस्वीकार येईल. खरं तर साधुसंतांमध्ये देखील एक अत्यंत सूक्ष्म आसक्ती असते. त्याग, तपस्येचा अहंकार असतो. परंतु भूदान चळवळीचे प्रणेते



आचार्य विनोबा भावेंनी त्या अहंकाराला स्वतःजवळ फिरकू दिले नाही. त्यांनी कधी, कुणाला आपले अनुकरण करायला सांगितले नाही.



कुणी विनोबांना विचारले, तुमचा उद्देश पूर्ण होईल का? तर ते म्हणतात, ''अग्नी फक्त जळतो. आपल्यावर कुणी भांडे ठेवावेत किंवा भांड्यात दाळ तांदूळ शिजवावेत. या गोष्टीची चिंता अग्नी करत नाही.''

# हातमपुरा ते जीपीओ चौक रस्त्यावरील अतिक्रमणे महानगरपालिकेने हटविली

### पोलिस बंदोबस्तात राबविली मोहीम, रस्त्यावरील वाहतुकीतील अडथळे दूर

नगर – शहरातील हातमपुरा ते जीपीओ चौक रस्त्यावरील विविध प्रकारची अतिक्रमणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ५ फेब्रुवारीला मोठ्या पोलिस बंदोबस्तात हटविली आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीतील अडथळे दूर झाले आहेत.

या रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूने असलेली अतिक्रमणे रहदारीला अडथळा ठरत होती. त्यामुळे आयुक्त यशवंत डांगे



हातमपुरा ते जीपीओ चौक रस्त्यावरील अतिक्रमणे पोलिस बंदोबस्तात काढताना मनपा पथक. (छाया–बबलू शेख)

यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विरोधी पथकाने मोठ्या पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविली. अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, उपअभियंता सुरेश इथापे, झेंडीगेट झोनचे प्रभाग अधिकारी श्यामराव गोडळकर, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख यांच्या सह अधिकारी, कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी कोतवाली पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

या रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूचे चालू व बंद अवस्थेत असलेल्या टपऱ्या, हातगाड्या, भंगारवाल्यांचे साहित्य, नाष्टा व इतर खाद्यपदार्थांच्या गाड्या, पत्रा शेडची अतिक्रमणे हटविण्यात आली. दुपारी उशिरापर्यंत ही मोहीम सुरू होती.

# सुरक्षित वाहतुकीसाठी महामार्गालगतची अतिक्रमणे त्वरित काढा : जिल्हाधिकारी

नगर – सुरक्षित वाहतुकीसाठी फेब्रुवारी अखेरपर्यंत जिल्ह्यातील महामार्गालगतची अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावी आणि रस्त्याच्या बाजूला असलेले धोकादायक फलकही काढण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिले.



बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, रस्त्याच्या कडेला असणारी अतिक्रमणे काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील. तोडलेल्या रस्ता दुभाजकांची दुरूस्ती करण्यात यावी. दुभाजक तोडणाऱ्या संबंधित पेट्रोल पंप चालक अथवा आस्थापना मालकावर कारवाई करावी. वाहतूक सुरक्षेबाबत सर्वेक्षण करण्यासाठी संस्थेची नियुक्ती करण्यात यावी. नेवासे आणि इमामपूर येथील अपघातप्रवण भागात आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाबाबत जनजागृती करण्यात यावी. शाळांमधून पालकांना याबाबत सूचना देण्यात यावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. बैठकीत जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेबाबत परिसर संस्थेतर्फे सादरीकरण करण्यात आले. यातील अधिक गंभीर ब्लॅक स्पॉटबाबत तातडीने उपाययोजना सुरू कराव्यात असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीत शासकीय आणि अशासकीय सदस्यांनी रस्ता सुरक्षेबाबत विविध सूचना केल्या.

# लग्नसमारंभासाठी बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाच्या घरी चोरी; दागिने लंपास

नगर – लग्न समारंभाकरीता बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत आतील सामनाची ऊचकापाचक करून घरातील सोन्या–चांदीचे दागिने चोरून नेले. ही घटना सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील गावडेमळा येथील कादंबरीनगरी येथे ४ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास घडली.

याबाबत शहदेव भगवान पवार (वय ३८, रा. कादंबरी नगरी, गावडेमळा, पाईपलाईन रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ३ फेब्रुवारी रोजी सकाळी कुटुंबासह पाथर्डी येथे नातेवाईकाचे लग्न असल्याने घराला कुलूप लावुन गेले होते. त्यानंतर ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ते घरी आले असता त्यांना घराच्या दरवाजाचे कडीकोयंडा तुटलेले दिसुन आले. त्यानी घरातील कपाटात ठेवलेले सोने व चांदीचे दागिने पाहिले असता ते मिळून आले नाही.

तेव्हा त्यांची खात्री झाली की, घरात चोरी झालेली आहे. चोरट्यानी घरातील २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पट्टी गंठण, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, चार जोड सोन्याचे मणी, पळ्या, चार नग कानातले सोन्याचे रिंगा, गळ्यातील सोन्याचा ओम, नाकातील एक सोन्याची नथ, नाकातील एक सोन्याची मुरणी, गळ्यातील दोन सोन्याचे छोट्या पळ्या,कानातील एक सोन्याची रींग जोड, पायातील चांदीचे जोडवे, पायातील चांदीचे पट्‌ट्या, एक जोड चांदीची कंबर साखळी असा ऐवज चोरुन नेला.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी शहदेव पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भा. न्या. सं. २०२३ चे कलम ३०५ (अ) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.अधिक तपास पोलीस हवालदार दिपक गांगुर्डे करीत आहेत.

# महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून नगर शहरात कर्करोग तपासणी मोहीम सुरू

### पथकाकडून ३० वर्षांवरील नागरिकांची होणार तपासणी; मोहिमेला सहकार्य करून आरोग्य विभागामार्फत तपासणी करून घ्यावी

नगर – राज्य शासनाच्या निर्देशानुसार अहिल्यानगर शहरात कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम महानगरपालिकेच्यावतीने राबवण्यात येत आहे. ४ फेब्रुवारी म्हणजेच मंगळवारपासून शहरात ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे पथक घरोघरी जाऊन, तसेच आरोग्य केंद्रात आढळणारे संशयित कॅन्सर रुग्ण शोधून त्यांना पुढील उपचारासाठी, शस्त्रक्रियेसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयाकडे पाठवणार आहेत. नागरिकांनी या मोहिमेला सहकार्य करून आरोग्य विभागामार्फत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

मोहिमेदरम्यान प्रामुख्याने ३० वर्षावरील नागरिकांचे मौखिक, स्तन व गर्भाशयमुख कर्करोग तपासणी करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी समन्वय साधून ही मोहीम राबवत आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशन, इंडीयन डेंटल असोसिएशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर्स अशा संस्थांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यात येणार आहे.

महानगरपालिकेने आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचाऱ्यांचे पथक तयार केले आहे. घरोघरी जाऊन पथक नागरिकांची तपासणी करणार आहेत. महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातही तपासणी केली जाणार आहे. संशयित रुग्ण आढळल्यास त्याला उपचार व गरज पाडल्यास शस्त्रक्रियेसाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात येणार आहे.

नागरिकांनी या पथकाला तपासणीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

## पान स्टॉल शेजारून मोपेडची चोरी

नगर – बालिकाश्रम रोड वरील शिवनेरी पान स्टॉल दुकानाशेजारी रस्त्याच्या कडेला लावलेली सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड (क्र. एम एच १६ सी टी ५६००) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सुरज संतोष गेनप्पा (रा. संत ज्ञानेश्वर चौक,जुने कोर्ट जवळ अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार गणेश धोत्रे करीत आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ६ फेब्रुवारीला छातीविकार व ॲलर्जीसाठी मोफत तपासणी

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पीटलमध्ये ६ फेब्रुवारीला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत छातीविकार व ॲलर्जीसाठी मोफत



तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात फुफ्फुसाचे सर्व आजार, झोपेसंबंधीचे सर्व विकार, ॲलर्जी विकार, दमा, न्युमोनिया, न थांबणारा खोकला ही लक्षणे असणाऱ्या रूग्णांसाठी मोफत तपासणी करण्यात येणार असून सवलतीच्या दरात तपासणी केली जाणार आहे. पुणे फुप्फुस विकार तज्ञ डॉ. स्नेहा तिरपुडे या रूग्णांची तपासणी करून उपचाराविषयी मोफत मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पीटलमध्ये हायटेक पॅथॉलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिनव्दारा सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनाग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये तर एमआरआय २५०० रुपयात केले जाते. याशिवाय आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. याचा रूग्णांनी लाभ घ्यावा. तसेच माहितीसाठी ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ऊर्जा गुरुकुल शाळेमध्ये ३ दिवस बालसाहित्य महोत्सवाचे आयोजन

नगर – ऊर्जा गुरुकुल स्कूल, केडगाव, अहिल्यानगर आणि फंकी रेनबो या बंगलोर स्थित संस्था यांच्या सहकार्याने ६ आणि ७ फेब्रुवारीला सकाळी ९:३० ते सायंकाळी ६:०० पर्यंत आणि ८ फेब्रुवारी (शनिवार) सकाळी ९:३० ते दुपारी २:०० पर्यंत बालसाहित्य महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. यात ऊर्जा गुरुकुल स्कूलमधील मुलांना पुस्तकांच्या लेखकांना भेटण्याची व या सत्रादरम्यान त्यांच्याशी संवाद साधण्याची ही एक संधी मिळणार आहे.

मुलांसाठी वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके (विक्रीसाठी) उपलब्ध करून दिली जाणार आहेत. पुस्तकांचे विविध प्रकार जसे की, पिक्चर बुक्स, ॲक्टिविटी बुक्स, कॉमिक्स आणि ग्राफीक नॉवेल्स, मिडल रीडर्स, बुक्स फॉर द यंग अडल्ट, चॅप्टर बुक्स त्याचप्रमाणे इंग्रजी व हिंदी भाषांमधील अधिक पुस्तके या साहित्य महोत्सवा दरम्यान बघायला मिळणार आहेत. आपल्या मुलांस त्यांच्या (वयानुसार) पुस्तकाच्या स्वरूपित प्रती मिळविण्याचा अविस्मरणीय अनुभव देता येणार आहे. उत्सव सत्र आयोजित करणारे लेखक हे आहेत : नियती शर्मा, नंदिनी नायर, पियूष सेखसरीया, विद्या मनी (संस्था– फंकी रेनबो).

## संत तुकारामांचे अकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांची आत्महत्या

पुणे – संत तुकाराम महाराजांचे वंशज आणि प्रसिद्ध



व्याख्याते शिरीष महाराज मोरे यांनी आपली जीवन यात्रा संपवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. शिरीष महाराज मोरे हे संत तुकाराम महाराज यांचे अकरावे वंशज होते. त्यांच्या निधनाने संपूर्ण वारकरी संप्रदायावर एकच शोककळा पसली आहे. त्यांनी हे टोकाचं पाऊल का उचललं याबाबत अद्याप कुठली अधिकृत माहिती मिळाली नाही.

याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, शिरीष महाराज यांनी आर्थिक विवंचनेतून हे टोकाचं पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. मंगळवारी (४ फेब्रुवारी) रात्रीच्या सुमारास उपरण्याच्या सहाय्याने त्यांनी गळफास लावून घेतल्याची माहिती आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक तसेच शिवशंभु प्रतिष्ठानचे अध्यक्ष, प्रखर हिंदुत्ववादी विचारवंत अशी शिरीष महाराज मोरे यांची ओळख होती.

# नागरिकांच्या लोकवर्गणीतून भुईकोट किल्ला जॉगिंग ट्रॅकची स्वच्छता; जेसीबीच्या सहाय्याने हटविले वेड्या बाभळी, गवत, काटेरी झाडे–झुडपे

### मागील चार वर्षापासूनचा उपक्रम; जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

नगर – शहरातील भुईकोट किल्ला परिसरात असलेल्या ४ किलोमीटर पर्यंतच्या जॉगिंग ट्रॅकच्या कडेला पसरलेल्या वेड्या बाभळी, गवत, काटेरी झाडे–झुडपे जेसीबीच्या सहाय्याने लोकवर्गणीतून हटविण्यात आले. सकाळी व संध्याकाळी जॉगिंग ट्रॅकवर फिरण्यास येणारे नागरिक व व्यायामासाठी असलेल्या युवकांनी लोकवर्गणीतून हे काम मार्गी लावले. मागील चार वर्षापासून पावसाळा संपल्यानंतर किल्लूयाच्या जॉगिंग ट्रॅकवर फिरण्यास येणारे नागरिक व युवक सातत्याने हा उपक्रम राबवित आहे. जिल्हा प्रशासनाने देखील याकडे लक्ष देऊन भुईकोट किल्ला परिसराच्या स्वच्छतेसाठी योगदान द्यावे व या भागात पथदिवे बसवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.



नागरिकांच्या लोकवर्गणीतून भुईकोट किल्ला जॉगिंग ट्रॅकची स्वच्छता करण्यात आली.

किल्ला परिसरातील जॉगिंग ट्रॅकच्या कडेला मोठ्या प्रमाणात पसरलेले वेड्या बाभळी, गवत, काटेरी झाडे–झुडपे जेसीबीद्वारे हटविण्यात आले. यासाठी जालिंदर बोरुडे, गुरुदयालसिंग सुगु, मुस्तफा खान, उस्मान रावसाहेब, समीर शेख, अरविंद ब्राह्मणे, इम्तियाज जहागीरदार, माऊली कुन्हे, इलियास जहागीरदार, साहिल शेख, राहुल गोंधळे, ऐहसान शेख, संतोष भैय्या, वैभव सोळंके, योगेश गांधी, दिलीप जगताप, प्रकाश तिपुळे, आर.ए. खामकर, यु.ए. बोरुडे, प्रभाकर दडाळे, के.बी. शेळके, मच्छिंद्र पडोळे, राकेश कुलकर्णी, फरदीन शेख, उद्योजक पोखरणा, गांधी, पटेल आदींचे सहकार्य लाभले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, मागील चार वर्षापासून नागरिक लोकवर्गणीतून भुईकोट किल्ला परिसरातील जॉगिंग ट्रॅकची स्वच्छता करत आहे. निसर्गरम्य ठिकाण असलेल्या या जॉगिंग ट्रॅककडे जिल्हा प्रशासनाने देखील लक्ष देण्याची गरज आहे. या मैदानावर सराव करुन अनेक पोलीस, लष्करातील जवान व अधिकारी वर्ग घडले आहे. ज्येष्ठ नागरिकांसह युवा वर्ग देखील व्यायामासाठी मोठ्या संख्येने येत असून, या जॉगिंग ट्रॅकवर सोयी–सुविधा निर्माण करुन देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

## हिराबाई कोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – काष्टी (ता.श्रीगोंदा) येथील रहिवासी हिराबाई



जनार्धन कोकाटे (वय ९०) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर घोडनदी तिरावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिवअमृत पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन गोरख कोकाटे, मधुकर कोकाटे, प्रभाकर कोकाटे यांच्या त्या मातोश्री होत तर संभाजी व मच्छिंद्र कोकाटे यांच्या चुलती होत.

## बाबासाहेब उधार यांचे हृदयविकाराने निधन

नगर – निमगाव वाघा येथील बाबासाहेब रघुनाथ उधार



(वय ४०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. नेप्ती येथील रामदास फुले व भानुदास फुले यांचे ते भाचा जावई होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे गावात दुखवटा म्हणून ग्रामस्थांनी व्यवहार बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचा निमगाव वाघा येथील अमरधाम येथे अंत्यविधी करण्यात आला.



### सुर्योदय दुर्मिळ

शहरात वाढणाऱ्या वसाहती उंच इमारती यामुळे सुर्योदय, सुर्यास्त दुर्मिळ होत आहे. संक्रांतीनंतर सूर्याचे उत्तरायण सुरु होत आहे. आज पाईपलाईन रस्त्यावर मात्र सकाळी ७ चे सुमारास सूर्योदयाने अनेकांचे लक्ष वेधले होते. (छाया– विजय मते)

## बीबीए / बीसीएसाठी 'सीईटी' आवश्यक

नगर – १२ वी नंतर काय यावर अनेक वेळा बीबीए / बीसीए हे उत्तर असायचे परंतु आता यामध्ये बदल झाला असून जर बीबीए / बीसीए करायचे असेल तर शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सीईटीला विद्यार्थ्यांना बसावे लागेल अशी माहिती आयएमएस संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी दिली. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या नियमामुळे या पुढे प्रवेश परीक्षा दिलेले विद्यार्थीच या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून हे दोन्ही अभ्यासक्रम आय एम एस मध्ये शिकविले जाणार असून विद्यार्थ्यांनी संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन देखील करण्यात आले आहे. एमबीए व एमसीए हे व्यवस्थापनातील दोन्ही अभ्यासक्रम संस्थेत गेली ३५ वर्ष शिकविले जात आहेत त्यामुळे कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर टी सोडवण्यासाठी साठी आवश्यक असणारे अनुभवी शिक्षक इथे उपलब्ध आहेत. १० फेब्रुवारी पर्यंतच विद्यार्थी फॉर्म भरू शकतात त्यामुळे त्यापूर्वी संस्थेशी किंवा ९८२३१००७५६ / ९८९००७००७७ यावर संपर्क साधावा असे आवाहन उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे.

## महिला मंडळाच्या नवीन कार्यकारिणीची नियुक्ती

नगर – अहमदनगर महिला मंडळाची ३१ जानेवारी रोजी दुपारी ५ वाजता सर्वसाधारण सभा झाली. त्यात २०२५ ते २०३० या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आली.

अध्यक्षा – सौ. ज्योती केसकर, उपाध्यक्षा – सौ. विद्या होलेहोन्नूर, सचिव – प्रा. सौ. ज्योती कुलकर्णी, सहसचिव – शिल्पा रसाळ, खजिनदार – सौ. पद्मजा धोपावकर, सहखजिनदार – सौ. गौरी मुळे.

सदस्य – सौ. उमा देशमुख, सौ. मीनल गंधे, श्रीमती पुष्पा चितांबर, सौ. अनुराधा देशमुख, शकुंतला पाटील.

निमंत्रित सदस्य – सौ. स्मिता देशमुख, सौ. रोहिणी पुंडलिक.

## शिर्डीच्या पोलिस निरीक्षकांची तडकाफडकी बदली

नगर – शिर्डी येथील साई संस्थानच्या दोघा कर्मचाऱ्यांचा खून करणारे व आणखी एकावर हल्ला करणाऱ्या नशेखोर गुन्हेगारांवर यापूर्वी दरोडा, घरफोडी, चोऱ्यांचे गुन्हे दाखल आहेत. त्यांना जिल्ह्यातून हद्दपारही करण्यात आले होते. त्यानंतरही ते शिर्डीत वावरत होते व त्यांनी खूनही केले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी शिर्डीचे पोलिस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांची ४ फेब्रुवारीला तडकाफडकी नियंत्रण कक्षात बदली केली आहे.

दोन सराईत गुन्हेगारांनी ३ फेब्रुवारीला तिघांवर हल्ला केला. यात साई संस्थानच्या सुभाष घोडे व नितीन शेजुळ या दोघा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर कृष्णा देहरकर हे गंभीर जखमी झाले. शिर्डीत गुन्हा केलेले गुन्हेगार हद्दपार होते. तरीही शिर्डीत येऊन त्यांनी गंभीर गुन्हा केला. त्यामुळे कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पोलिस निरीक्षक कुंभार यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आल्याचे अधीक्षक ओला यांनी सांगितले. कुंभार यांच्या जागी राहाता येथील पोलिस निरीक्षक रणजीत गलांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, आर्थिक गुन्हे शाखेतील पोलिस निरीक्षक नितीन चव्हाण यांची राहाता पोलिस ठाण्याचे निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### तर शेवग्याच्या शेंगा हानीकारक

शेवग्याच्या शेंगा (मोरिंगा) याला सुपरफूड म्हटले जाते, कारण त्यात अनेक पोषक घटक असतात. याच्या शेंगा, पाने आणि फुले आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जातात. पण, शेवग्याच्या शेंगाचे अनेक फायदे असले तरी, काही परिस्थितींमध्ये त्याचा जास्त किंवा चुकीचा वापर केल्यानेही हानी होऊ शकते.

## पाककला

### मेथीची पराठे

**साहित्य –** मेथी पान एक कप, पीठ दोन कप, ओवा अर्धा टीस्पून, हळद १/४ टीस्पून, तिखट १/२ टीस्पून, चवीनुसार मीठ, तेल र्धा टेबलस्पून, पाणी, तूप किंवा बटर

**कृती –** सर्वात आधी मेथी स्वच्छ करून चिरून घ्यावी. आता एका मोठ्या भांड्यात पीठ चाळून घ्यावे. आता त्यात चिरलेली मेथीची पाने, ओवा, हळद, तिखट, तेल, मीठ घालावे. हे सर्व साहित्य चांगल्या प्रकारे मिक्स करावे. नंतर हळूहळू पाणी घालून पीठ मऊ मळून घ्यावे. पीठ मळल्यानंतर काही वेळ झाकून ठेवावे. आता मळलेल्या पिठाचे छोटे गोळे बनवा. पिठाचा गोळा घेऊन तुम्हाला आवडेल त्या आकारात पराठा लाटून घ्यावा. आता पॅन गरम करून त्यावर तूप किंवा तेल लावावे. लाटलेला पराठा तव्यावर टाकून सर्व बाजूंनी शेकून घ्यावा. आता पराठा बनल्यानंतर आवडीप्रमाणे त्यावर बटर टाकू शकतात.

## वास्तू

### शाळा कार्यालय कसे असावे?

✻ संस्थेचे अथवा शाळेचे कार्यालय पश्चिम भागात असावे किंवा खालच्या एखाद्या मजल्यावर त्याच दिशेत घेणे सोयीस्कर ठरते.

✻ त्यातसुद्धा पुस्तकांची जड कपाटे पश्चिम ते नैऋत्य भागात व वाचनालय बैठक व्यवस्था त्या दालनाच्या वायव्य भागात, उत्तर ते पूर्व दिशेकडे तोंड करून बसता येईल अशा पद्धतीने असावी.

## सल्ला

पाण्यात पुदिना टाकून प्या. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर होतील

## सौंदर्य

हिवाळ्यात पाय मऊ, गुळगुळीत आणि भेगा न पडण्यासाठी ग्लिसरीन हा एक सोपा उपाय आहे. हात व पायांना स्वच्छ करून दही व लिंबू किंवा मध व लिंबू हे मिश्रण लावून चोळावे. याने हात पाय तेजस्वी होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५

**--- शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, कृतिका १९।२९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २५ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम अंगलट येईल.

**वृषभ** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे.

**मिथुन** : धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये स्थिती अनुकूल राहिल. सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल. जुन्या मित्रांचा सहवास लाभेल.

**सिंह** : गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**कन्या** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**तूळ** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक** : सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होईल. वैवाहिक सुख वाढेल.

**धनु** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल मात्र शत्रू प्रभावहीन पडतील.

**मकर** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**कुंभ** : आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही. व्यापारात मोठे नुकसान होईल.

**मीन** : घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. उधारी उसनवारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### ‘मी रस्ता चुकलो नाही’

ग्रामीण भागात दोन रस्ते मिळणाऱ्या ठिकाणी एक प्रवासी रस्ता चुकला. त्याने गुराख्याला विचारले, ‘डावीकडचा रस्ता कुठे जातो?’

गुराखी म्हणाला, ‘माहीत नाही’

प्रवासी – ‘उजवीकडचा रस्ता कुठे जातो’

गुराखी – ‘माहीत नाही’

प्रवासी – ‘तुला या भागाची माहिती नाही हे अडचणीचे आहे.’


गुराखी – ‘मला रस्ते माहीत नसतील पण मी रस्ता चुकलेलो नाही’

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

तेलंगणातील कोणते गाव सर्वोत्तम पर्यटन गाव म्हणून घोषित केले? – पोचमपल्ली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१०८ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१०७ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) देऊळ; मंदिर; राऊळ ४) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा ७) दशा; अवस्था; गत; वाईट स्थिती ८) पश्चिम बंगालची राजधानी ९) कोन; कॉर्नर ११) भीती; भय १४) गावात राहणारे लोक १७) दोलायमान; अस्थिर १८) धर्मांतरित; बाटलेला २०) ढिला; सैल २१) उष्णता; आंच; ऊब

**उभे शब्द :-** १) मृत्यू; मरण; देवाज्ञा २) एक धान्य ३) निलाजरा; निर्लज्ज ४) घाण; विष्ठा ५) आयात होणाऱ्या मालावरील कर ६) वेल; वल्लरी ८) करकरीत; न लिहिलेला (कागद) १०) दुर्दशा; दैना १२) मुस्लीम पुरुषाचे एक नाव १३) काश्मीरमधील एक शहर १५) आस्था; आपुलकी १६) चार बाजूंनी पाणी व मध्ये जमीन असा प्रदेश १८) वडिलांचे संबोधन १९) दाट; निबिड; खोल; दाट

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : सेवेसाठी पैशांची आवश्यकता नसते तर गरजूंशी एकरुप होण्याची गरज असते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## कणिक रेफ्रिजरेटरमध्ये ठेवणे आरोग्यदायी आहे का?

आधुनिक जीवनशैलीत वेळेअभावी, लोक अनेकदा पीठ आधीच मळून घेतात आणि स्वयंपाकासाठी रेफ्रिजरेटरमध्ये ठेवतात. असे करणे सोयीचे वाटते, पण रेफ्रिजरेटेड पिठापासून बनवलेल्या रोटीचा तुमच्या आरोग्यावर काय परिणाम होतो याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? ही एक सामान्य पद्धत बनली आहे, परंतु त्याचे फायदे आणि तोटे दोन्ही समजून घेणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा पीठ मळून जास्त वेळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले जाते तेव्हा त्यात असलेले कार्बोहायड्रेट्स आणि इतर पोषक घटक हळूहळू रासायनिकदृष्ट्या बदलू लागतात. थंडीमुळे, पिठामध्ये किण्वन प्रक्रिया सुरू होते. या प्रक्रियेमुळे बॅक्टेरिया आणि यीस्ट तयार होऊ शकतात, ज्यामुळे पिठाची चव आणि गुणवत्ता बदलू शकते. किण्वन दरम्यान, पीठाला थोडासा आंबटपणा येऊ शकतो, ज्यामुळे ब्रेडच्या चवीवर परिणाम होतो. याशिवाय, रेफ्रिजरेटरमध्ये बराच काळ ठेवलेल्या पिठातील पोषक घटक हळूहळू कमी होतात, ज्यामुळे त्याचे पौष्टिक मूल्य देखील कमी होते. तथापि, रेफ्रिजरेटेड कणकेपासून रोटी बनवण्याचा एक मोठा फायदा म्हणजे तो वेळ वाचवतो. जर तुम्ही काम करणारे असाल आणि दररोज पीठ मळण्यासाठी वेळ काढू शकत नसाल तर ही पद्धत तुमच्यासाठी सोयीस्कर ठरू शकते.

काही लोकांचा असा विश्वास आहे की हलक्या आंबलेल्या पिठापासून बनवलेली ब्रेड पचायला थोडी सोपी असू शकते, कारण आंबवण्याची प्रक्रिया पचन सुधारण्यास मदत करू शकते. पण हा फायदा तेव्हाच होतो जेव्हा पीठ जास्त काळ साठवले जात नाही आणि त्यात कोणतेही हानिकारक जीवाणू विकसित झाले नाहीत. रेफ्रिजरेटरमध्ये बराच काळ ठेवलेल्या पिठामध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजांचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे रोटीची पौष्टिक पातळी कमी होते. रेफ्रिजरेटरमध्ये साठवलेल्या पिठाची चव आंबट असू शकते आणि ताज्या पिठाच्या तुलनेत त्याला विचित्र वास येऊ शकतो. याचा पोळीच्या चवीवर परिणाम होतो. जर पीठ जास्त काळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले तर त्यात बॅक्टेरिया आणि बुरशी विकसित होऊ शकतात, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. खराब झालेल्या पिठापासून बनवलेली ब्रेड खाल्ल्याने पोटदुखी, गॅस किंवा अपचन यांसारखे पचनसंस्थेवर वाईट परिणाम होऊ शकतो. जर तुम्हाला फ्रीजमध्ये पीठ ठेवावे लागले तर काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. पीठ मळल्यानंतर, ते जास्तीत जास्त १-२ दिवस रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा. पीठ मळण्यासाठी स्वच्छ भांडी आणि पाणी वापरा, जेणेकरून त्यात बॅक्टेरिया वाढणार नाहीत. रेफ्रिजरेटरमध्ये पीठ साठवण्यापूर्वी ते हवाबंद डब्यात ठेवा जेणेकरून ते दूषित होणार नाही. रेफ्रिजरेटरमधून काढलेले पीठ वापरण्यापूर्वी चांगले मळून घ्या आणि लगेच पोळ्या बनवा.

## अती लोभ

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलात सर्व प्राणी एकत्र राहत होते. सर्व प्राणी जंगलाचे नियम पाळत असत. त्या प्राण्यांमध्ये चिनी आणि मिनी नावाच्या दोन मांजरी होत्या. तसेच दोघेही खूप चांगल्या मैत्रिणी होत्या. एकदा मिनीला काही कामासाठी बाजारात जायचे होते, पण काही चिनी तिच्यासोबत जाऊ शकली नाही. चिनीला एकटे राहायचे नव्हते, म्हणून तिने विचार केला की तीही बाजारात जाऊन येईल. वाटेत चालत असताना तिला एक भाकरीचा तुकडा सापडला. तिने तो भाकरीचा तुकडा घरी आणला. ती भाकरीचा तुकडा खाणार तेवढ्यात मिनी आली. मिनी तिला म्हणाली, ‘आज मला भाकरी देणार नाहीस का?’

चिनीने मिनीला पाहिले तेव्हा ती घाबरली गोंधळून म्हणाली, ‘अस नाही, मी फक्त भाकरी अर्ध्या भागात वाटत होते जेणेकरून आपल्या दोघांनाही समान प्रमाणात खायला मिळेल.’ मिनीला सगळं समजलं आणि तिच्या मनात लोभही निर्माण झाला, पण ती काहीच बोलली नाही. भाकरीचे तुकडे होताच, मिनी ओरडली की तिच्या वाट्याला कमी भाकरी आली आहे. यावरून दोघांमध्ये भांडण झाले आणि हळूहळू ही बातमी जंगलात पसरली. त्या वेळी एक माकड तिथे आले आणि म्हणाले की तो भाकरी दोघांमध्ये समान वाटून घेईल. सर्व प्राणी माकडाशी सहमत झाले. आता इच्छा नसतानाही दोघीनींही भाकरी माकडाला दिली.

माकडाने एक तराजू आणला आणि दोन्ही बाजूंना भाकरीचे तुकडे ठेवले. ज्या बाजूला जास्त वजन असायचे, तो त्या बाजूने थोडीशी भाकरी खाऊन म्हणायचा की मी ही भाकरी दुसऱ्या बाजूला ठेवलेल्या भाकरीच्या वजनाइतकी बनवत आहे. तो मुद्दामहून भाकरीचा एक तुकडा खात असे, ज्यामुळे दुसऱ्या बाजूची भाकरी जड होत असे. असे केल्याने, दोन्ही बाजूंनी भाकरीचे खूप लहान तुकडे राहतात. जेव्हा मांजरींना कमी भाकरी दिसली तेव्हा त्या म्हणू लागल्या की, आमचे भाकरीचे तुकडे परत द्या. उरलेली भाकरी आपण आपापसात वाटून घेऊ. मग माकड म्हणाला, ‘‘तुम्ही दोघेही खूप हुशार आहात. माझ्या कष्टाचे फळ तुम्ही मला देणार नाही का?’’ असे म्हणत माकडाने दोन्ही बाजूंनी उरलेले भाकरीचे तुकडे खाऊन टाकले आणि निघून गेला आणि दोन्ही मांजरी एकमेकींकडे बघता राहिल्या.

**तात्पर्य –** कधीही लोभी असू नये. लोभी राहिल्याने जवळ असलेले देखील गमावू शकतो.

# रहमते दर्शन (भाग – १)



मौत को सामने देख कर मेरे मुँह से अनायास ही निकल पड़ा, हे सत्गुरु! इस समय तू ही मेरा मालिक है, आज अपने विरद की लाज रखना। इतना कह कर मुझ में एक अभूतपूर्व शक्ति आ गई कि जब मौत आयेगी तो लेने के लिए तो गुरु ही आयेगा । ये उग्रवादी चाहे कुछ भी कर लें, मेरा कुछ बिगाड़ नहीं सकते।

थोड़ी देर में क्या देखता हूँ कि चारों उग्रवादी बड़े सहमे हुए से लग रहे थे। जब गौर से मैंने उन चारों की आँखों में बारी-बारी से देखा तो मुझे बारी-बारी से चारों उग्रवादियों की आँखों में चार महापुरुषों यानी पहले की आँखों में हुज़ूर बाबा सावनसिंह जी महाराज, दूसरे की आँखों में संत कृपालसिंह जी

### महान नायक

महाराज, तीसरे की आँखों में संत दर्शनसिंह जी महाराज और चौथे की आँखों में मौजूदा महाराज संत राजिन्दर सिंह जी महाराज के दर्शन हुए।

जब मैंने उनकी सहमी-सहमी सी दशा देखी तो उनसे निवेदन किया कि क्या आपको पानी वगैरह चाहिये। उन्होंने कहा, नहीं । बल्कि जाते समय कहने लगे, अगर आप लोगों को किसी चीज़ की जरूरत हो तो हम सब आपकी सेवा में हाजिर हैं, और इतना कहकर वे चले गये।

कुछ मास पश्चात एक उग्रवादी पुनः आया और कहने लगा, आप लड़कियों को निर्देश दे दें. ताकि वे नंगे सिर न रहें, बल्कि अपने सिर पर केसरिया चुन्नी डाल कर रखें। मैंने उत्तर दिया, मैं उन्हें मजबूर तो नहीं कर सकता। कह दूँगा, अगर वे मान जायें। अगले दिन क्या देखता हूँ कि सारी लड़कियाँ अपने-अपने सिरों पर केसरी चुन्नी पहने हैं। यह है पूर्ण पुरुष की पहचान और शान ।

### बिन गुरु मेरा कोई ना सहाई

मैं यहाँ दर्शनसिंह जी महाराज द्वारा मेरे म ता-पिता की रक्षा के बारे में एक घटना का वर्णन करना चाहती हूँ।

एक बार मैं अपने माता-पिता के साथ रेलवे के प्रथम श्रेणी के डिब्बे में सफर कर रही थी। मेरे पिता एक सिविल इंजीनियर हैं। गाड़ी बड़ी रफ़्तार से अपने गंतव्य की ओर बढ़ रही थी।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

जब आप एक्सीडेंट के बारे सोचते हैं तब एक्सीडेंट होता है। ड्राइवर के विचार अच्छे हैं तो गाड़ी सुरक्षित चलेगी चाहे गाड़ी में बैठे लोग नकारात्मक विचारों के ही हों। आप के साथ घर में, दुकान में, नौकरी में, आश्रम में, बस में, चाहे कोई कितने ही नकारात्मक लोग बैठें हो, खुद से पूछते रहें मेरे विचार केसे हैं। आप की प्रत्येक इच्छा पूरी तब होगी यदि आप दूसरों के काम में बाधा न डालें।

आप कपड़े की दुकान बनाते हैं, अंदर सोचते हैं, पड़ोसी की दुकान न चले तो आप की दुकान भी नहीं चलेगी। उस समय सोचो। पड़ोसी का भी काम चले तब आप का काम भी बढ़िया चलेगा। चार लड़के एक लड़की से प्यार करते हैं, चारो की इच्छा पूरी नहीं होगी ।। लड़की जिसे चाहती है उसकी इच्छा पूरी होगी। आप कुछ भी करें परंतु दूसरों के काम में टांग मत अड़ाओ। हमारे परिवार में सब तरह के लोग होते हैं। आप स्वंय और दूसरों के लिये जो

### दिमाग की शक्ती

शब्द कहते हैं उन के प्रति सजग रहें। चीखो मत, चीखने के वजाए, धीरे बोलो।

मैं फेल हो गया हूं कि बजाए बोलो मैं अभी कामयाब नहीं हुआ हूं। चुगली, इल्जाम, पर निन्दा, गाली गलौज, अपशब्द के बजाए अन्जान लोगों या मन पसंद लोगों के प्रति आशीर्वाद और मंगलमयी विचार मन में कहते रहें। अच्छे विचारों से दिमाग की अनन्त शक्तियों के भंडार खुल जाते हैं।

### व्यवहार काल से संसार परिवर्तन

इस समय संसार दुःखो का घर बना हुआ है। इसको सुधारने के लिए ऋषि-मुनि, साधु संत व समाज सुधारक लगे हुए हैं। विज्ञानिक नित नए प्रयोगों से विश्व को सुधारने में लगे हुए हैं। सरकारें अरबों रुपया देश की सुरक्षा और सुधार में खर्च कर रही हैं। सभी लोग संसार को सुधारने में सफल नहीं हुए हैं। समाज की दुर्दशा के लिए अनेको दलीले दी जाती हैं। संसार की जितनी भी समस्याए हैं उनका मूल कारण है व्यवहार की कमी। हम जैसा व्यवहार दूसरो के साथ करते हैं। दूसरे लोग उसी अनुसार ही प्रतिक्रिया करते हैं। अगर हम यह कहें कि बड़ी मछली छोटी मछली को खा रही है तो गलत नहीं होगा। यह भी सच है कि हरेक व्यक्ति यह जानता है कि उसे दूसरो के साथ कैसे व्यवहार करना चाहिये। परन्तु जब परिस्थिति आती है तो व्यक्ति गलत व्यवहार करता है। जिस व्यक्ति से गलत व्यवहार होता है वह आगे अपने से छोटों के साथ दुर्व्यवहार करता है और वह आगे अपने संबंध में आने वाले व्यक्तियों से करते हैं। इस तरह एक बुरा चक्र चल पड़ता है और चल रहा है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

निरोगी बाळाच्या झोपेची गरज त्याच्या वयावर, आजूबाजूचे वातावरण व व्यक्तिगत स्वत:च्या प्रकृतीवर अवलंबून असते.

काजळ : घरी तयार केलेले साजूक तुपातील काजळ बाळास लावावे. काजळामुळे बाळाची दृष्टी चांगली होण्यास मदत होते.

बाळाचे दात : बाळाच्या जन्मानंतर त्याच्या आरोग्याच्या दृष्टीने दात उगवण्याचा काळ हा सर्वात जास्त त्रासदायक असतो. आयुर्वेदामध्ये दंतउत्पत्तीमध्ये अस्थी व मज्जा या दोन धातूंचा मुख्य सहभाग सांगितलेला आहे. तसेच दंतउत्पत्ती होत असताना, बाळाला लालस्राव (लाळ गळणे सळसळणे, सुजणे व त्या ठिकाणी दंशवत वेदना होणे ही लक्षणे दिसतात. बाळांमधील दंतउत्पत्ती :

बाळामध्ये दुधाचे दात जन्मानंतर साधारणतः ५ ते १० महिन्यापर्यंत येत असतात संख्या २० असते. अस्थी व मज्जा या दोन धातूंवर दंतउत्पत्ती अवलंबून असते. बाळाचे धातू जर उत्तम, सारवान,

### नवजात बालकाची परिचर्या

बलवर्धक असतील, तर बाळाला दात उगविताना त्रास होत नाही दातांच्या मुळाशी असणारा वायू प्रकुपित होऊन हिरड्यांमध्ये सूज निर्माण करतो; त्यात विविध दंतोद्भवज व्याधी निर्माण होतात. अशा अवस्थेमध्ये बाळ तोंडामध्ये कुठलीही वस्तू घालून चावते. अशा वेळी ती वस्तू बाळ गिळणार नाही ना, याची काळजी घ्यावी. तोंडात धरलेली वस्तू दूषित असेल, तर बाळाला ताप, सरदी, खोकला, उलटी, जुलाब ही लक्षणे दिसू शकतात. अशा वेळी जे लक्षण उत्पन्न झालेले असेल, त्या लक्षणावरील उपचार करावा. दंतोद्भवज व्याधींवर उपाय करण्यासाठी बालगुटीतील अतिविषा, मुरुडशेंग, बाळहिरडा या औषधींचा वापर करावा. बाळाला नियमितपणे बालगुटी दिली, तर दंतोद्भवज व्याधींचा त्रास कमी प्रमाणात होतो. तसेच अस्थिधातू सारवान होण्यासाठी बाळाला कॅल्शियमचे औषध सुरू करावे. तसेच बाळ तोंडामध्ये दूषित वस्तू घालत नाही ना याकडे लक्ष द्यावे. बाळाच्या हिरड्यांना सूज असेल, तर त्रिफळा चूर्ण हिरडीला चोळावे; यामुळे बाळाला निश्चितच लाभ होईल. तसेच बाळाला तोंडामध्ये चावण्यासाठी लांब आकाराची मोठी खारीक चघळण्यास द्यावी. फक्त ती बाळ गिळणार नाहीना याची काळजी घ्यावी. दंतोत्पत्ती बाबतीत अंदाज : सहाव्या महिन्यात – पहिला दात

बाराव्या महिन्यात – सहा दात अठराव्या महिन्यात – बारा दात

दोन वर्षांपर्यंत – अठरा दात तीन वर्षांपर्यंत

सर्व वीस दात (दुधाचे) दात येतात. बाळाची खेळणी: जर बाळाला १० महिन्यांपर्यंत दात आले नाही, तर वैद्यकीय सल्ला घ्यावा.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगर शहरामध्ये ११, १२ व १३ फेब्रुवारी रोजी नगारा संगीत महोत्सव - २०२५' चे आयोजन

### पं. आनंद भाटे, विदुषी अंकिता जोशी व पं. कृष्णा बोंगाणे या कलाकारांचे शास्त्रीय गायन



नगर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर या महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने मागील पाच वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर या वर्षी ११, १२ व १३ फेब्रुवारी रोजी ६व्या 'नगारा संगीत महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे.

११ फेब्रुवारी रोजी सायं.६ वाजता महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते होईल. त्यानंतर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त गायक पं. आनंद भाटे यांची शास्त्रीय व सुगम गायनाची मैफल होणार आहे. त्यांना संवादिनीवर सुयोग कुंडलकर व तबल्यावर भरत कामत हे साथसंगत करणार आहेत. १२ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वाजता उस्ताद राशिद खां यांचे पट्टशिष्य, गायक पं. कृष्णा बोंगाणे व संगीतमार्तंड पं. जसराज यांच्या पट्टशिष्या, गायिका विदुषी अंकिता जोशी यांची 'जसरंगी' ही वैशिष्ट्यपूर्ण जुगलबंदीची शास्त्रीय मैफल आयोजित करण्यात आली आहे. त्यांना संवादिनीवर अभिनय रवंदे, अभिषेक शिनकर व तबल्यावर आशय कुलकर्णी व रामकृष्ण करंबेळकर हे साथसंगत करणार आहेत. याप्रसंगी अ.जि.म.वि.प्र.स. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज सभागृह येथे होणार आहेत.

तसेच, १३ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा महाविद्यालयातील राजर्षी शाहू सभागृह येथे व राज्यस्तरीय छोटाख्याल गायन स्पर्धा (वैयक्तिक) सेमिनार हॉल येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. सायं. ५ वाजता संस्थेचे सेक्रेटरी अ‍ॅड.विश्वासराव आठरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम विनामूल्य असून या कार्यक्रमासाठी संगीतप्रेमी रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, कला शाखेचे समन्वयक प्रा. डॉ.किसन अंबाडे व संगीत विभागप्रमुख प्रा. आदेश चव्हाण यांनी केले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हात बळकट करण्यासाठी सर्व नागरिकांनी भाजपाचे सदस्य व्हावे



महेंद्र गंधे

नगर - गेल्या १० वर्षापासून भारतीय जनता पार्टी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी बहुमोल योगदान देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारतास पूर्ण जगात मोठी प्रतिष्ठा मिळवून देण्याबरोबरच देशाची ताकदही वाढवली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्याची धुरा सक्षमपणे सांभाळत राज्याला वेगाने प्रगतीकडे नेण्यासाठी काम करत आहेत. भाजपच्या राष्ट्रहिताच्या विचारानेच आज देशात व राज्यात काम सुरु आहे. पक्षाच्या या कार्यात सर्व नागरिकांनी सहभागी होत नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांचे हात अजून बळकट करावेत. यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी भारतीय जनता पार्टीचे सदस्य व्हावे, असे आवाहन आहिल्यानगर सदस्य नोंदणी प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले आहे.

सध्या पूर्ण राज्यात सदस्य नोंदणी अभियान सुरु आहे. या अभियानास प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १९ फेब्रुवारी पर्यंत मुदत वाढ दिली आहे. त्यानुसार शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी प्रमुख महेंद्र गंधे हे शहराच्या विविध भागांमध्ये सदस्यता नोंदणी अभियान राबवत आहेत.

सर्व नागरिक भारतीय जनता पार्टीचे सदस्य होवू शकतात. मोफत सदस्य होण्यासाठी व केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांची माहिती करुन घेण्यासाठी आपल्या मोबाईलवरून ८८०००००२०२४ या मोबाईल नंबरवर फक्त मिस्ड कॉल द्यायचा आहे. त्यानंतर मेसेज मध्ये आलेल्या लिंकवर क्लिक करून स्वतःची माहिती भरून शेवटी रेफरन्स कोड च्या ठिकाणी RKZIMI हा कोड टाकून फॉर्म पूर्ण करावा व जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सदस्य होण्याचा बहुमान मिळवावा. अधिक माहितीसाठी ९६७३००३०५० ह्या क्रमांकावर संपर्क साधावा.



जेएसएस गुरुकुलच्या सोहम वाघस्करने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल त्याचा शाळेच्या वतीने प्राचार्य आनंद कटारिया यांनी सत्कार केला.

# जेएसएस गुरुकुलचा विद्यार्थी सोहम वाघस्कर याने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत पटकाविले प्रथम क्रमांक

नगर - जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जेएसएस) स्कूलचा विद्यार्थी सोहम अशोक वाघस्कर याने रोटरी मिडटाऊन करंडक आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्याचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. स्कूलचे प्राचार्य आनंद कटारिया यांनी वाघस्कर याचा सत्कार केला. याप्रसंगी शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

आनंद कटारिया म्हणाले की, विद्यार्थ्यांना शाळेत फक्त पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविले जात आहे. विद्यार्थ्याला ज्या क्षेत्राची आवड आहे, ती आवड ओळखून त्याला योग्य मार्गदर्शन करुन स्पर्धेत उतरविण्यात येत आहे. शाळेचे योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे विद्यार्थी विविध स्पर्धेत चमकत असल्याचे त्यांनी सांगितले.

नुकतीच शहरात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊनच्या वतीने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. यामध्ये शहरातील शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल वाघस्कर याला गोल्डन माईक पारितोषिक स्वरुपात प्रदान करण्यात आले.

तो जेएसएस स्कूलचा इयत्ता ५ वीचा विद्यार्थी आहे. या स्पर्धेसाठी त्याला त्याच्या आईने मार्गदर्शन केले.

# मराठी फक्त भाषा नसून, महाराष्ट्राच्या समृद्ध वारस्याचा एक भाग

### न्यायाधीश संगीता ना. भालेराव यांचे प्रतिपादन; कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा



कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात बोलताना न्यायाधीश संगीता ना. भालेराव.

नगर - भाषा ही संवादाचा अविभाज्य अंग आहे. आपले विचार भावना व्यक्त करण्याचे भाषा एक साधन आहे. महाराष्ट्रात मराठी सर्वात जास्त वापरली जाणारी भाषा आहे. जिल्हा न्यायालय स्तरापर्यंतची न्यायालयीन कामकाजाची भाषा ही मराठीच आहे. मराठी फक्त भाषा नसून, महाराष्ट्राच्या समृद्ध वारस्याचा भाग आहे. मराठीच्या बोली भाषेने आणि मौखिक परंपरेने एक मोठी लोकसंस्कृती उभी केली असल्याचे प्रतिपादन कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश संगीता ना. भालेराव यांनी केले.

कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. जुने जिल्हा न्यायालय येथील कौटुंबिक न्यायालयात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश भालेराव बोलत होत्या. याप्रसंगी लोक साहित्याचे मराठी अभ्यासक प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. लक्ष्मणराव कचरे, विशेष सरकारी वकील तथा उपाध्यक्ष अ‍ॅड. सुरेश लगड, सचिव अ‍ॅड. राजेश कावरे आदींसह कर्मचारी, वकील व पक्षकार उपस्थित होते.

पुढे बोलताना न्यायाधीश भालेराव म्हणाल्या की, वैविध्यपूर्णतेने नटलेली मराठी भाषा आहे. कोट्यावधी लोक मराठी बोलतात. समाज जीवनाला प्रगत करण्यासाठी भाषा विचारांचे साधन आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या पक्षकारांना देखील न्याय निर्णय सम जावा यासाठी जास्तीत जास्त निकाल मराठीत देण्याचा प्रयत्न केला जातो. कौटुंबिक न्यायालयात आल्यापासून आता पर्यंत ८६ टक्के न्याय निवाडे मराठीतच दिले आहे. सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगावा व भाषा समृद्ध करावी. तर येणाऱ्या पिढीला मराठी भाषेची गोडी लागण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ म्हणाले की, न्याय संस्थेकडून मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम होत असल्याचा मोठा आनंद आहे. मराठीला मोठ्या संघर्षातून अभिजीत मराठी भाषेचा दर्जा मिळाला आहे. याचा प्रत्येक मराठी माणसाला अभिमान आहे. मराठी अतिशय प्राचीन व जुनी आहे. निजामशाही काळातील सापडलेल्या शिलालेखावरून हे सर्व सिद्ध होते. एखाद्या भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा देण्याची राज्यघटनेत तरतूद आहे. त्याचे निकष ठरवून देण्यात आले असून, ती भाषा प्राचीन, इतिहासात नोंद असलेली, मौल्यवान वारसा, अस्सल साहित्यिक परंपरा व इतरांपेक्षा वेगळी असलेली असणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा मिळाल्याने केंद्र सरकारकडून दरवर्षी ३०० कोटी रुपये भाषेच्या विकासासाठी मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात अ‍ॅड. लक्ष्मणराव कचरे यांनी मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा मिळाला असताना मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा होत असल्याचे स्पष्ट करुन कार्यक्रमाचे उद्देश सांगितले. याप्रसंगी प्रबंधक एस.के. मोहोळकर, सहाय्यक अधीक्षक ए.आय. शेख, वरिष्ठ लिपिक सौ. झिंजे, स्टेनो एस.एफ. चव्हाण, कनिष्ठ लिपिक धीरज नारखेडे, सौ. तगारे, राहुल मोरे, शिपाई एस.के. जाधव, एल.एस. जाधव, अ‍ॅड. कैलास धावडे, अ‍ॅड. सुजाता बोडखे, अ‍ॅड. किरण पवार, अ‍ॅड. प्रतीक्षा मंगलारप, अ‍ॅड. के.एम. गोरे, अ‍ॅड. कैलास धावडे, पोलीस कर्मचारी भापकर, फालके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अ‍ॅड. राजेश कावरे यांनी केले. आभार अ‍ॅड. शारदाताई लगड यांनी मानले.

# उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी महिला वकील महत्त्वाची भूमिका बजावत आहे

### अ‍ॅड. अनुराधा येवले यांचे प्रतिपादन; जिल्हा न्यायालयात रंगला हळदी-कुंकूचा कार्यक्रम, विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या महिला वकीलांचा गौरव



अहिल्यानगर येथील जिल्हा न्यायालयात महिला वकीलांचा हळदी-कुंकूचा कार्यक्रम पार पडला.

नगर - न्यायालयात मोठ्या संख्येने असलेल्या महिला वकील कामात एवढ्या व्यस्त असतात की, एकमेकींची भेट घेऊन चर्चा देखील घडत नाही. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला वकील एकत्र येऊन विचारांची देवाण घेवाण करत आहे. न्यायिक क्षेत्रात महिला प्रामाणिकपणे कार्य करीत असून, उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास चौदा वर्ष झाले असून, महिला वकीलांचा सन्मान करुन त्यांना प्रोत्साहन देण्यात आले असल्याचे त्यांनी प्रतिपादन अ‍ॅड. अनुराधा येवले यांनी केले.

अहिल्यानगर येथील जिल्हा न्यायालयात महिला वकीलांचा हळदी-कुंकूचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. बाल कल्याण समितीच्या सदस्या अ‍ॅड. अनुराधा येवले यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात न्यायालयातील सर्व महिला वकील सहभागी झाल्या होत्या. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमासाठी वकील संघाच्या महिला सचिव अ‍ॅड. जयाताई पाटोळे, अ‍ॅड. निर्मला चौधरी, अ‍ॅड. ज्योती हिमणे, अ‍ॅड. वृषाली तांदळे, अ‍ॅड. स्वाती नगरकर, अ‍ॅड. मनीषा केळगंद्रे, अ‍ॅड. स्वाती पाटील, अ‍ॅड. कुंदा दांगट, अ‍ॅड. शिल्पा बेरड, अ‍ॅड. अनुजा काटे, अ‍ॅड. शारदा लगड, अ‍ॅड. लता गांधी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते नवनियुक्त नोटरी झालेल्या व सरकारी वकिलपदी नेमणुक झालेल्या महिला वकील यांचा सन्मान करण्यात आला. फॉरेन्सिक मेडिकल ऑफिसर म्हणून अ‍ॅड. शाहिसता सय्यद यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तर वकील संघाच्या नवनिर्वाचित महिला पदाधिकाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व महिलांना तिळगुळ देऊन वाण देण्यात आले. या हळदी-कुंकू कार्यक्रमाचे हे चौदावे वर्ष होते. कार्यक्रमात महिलांनी एकजुटीने एकत्र येवून विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी अ‍ॅड. प्रिया खरात, अ‍ॅड. भक्ती शिरसाठ, अ‍ॅड. पल्लवी होनराव, अ‍ॅड. अर्चना राऊत, अ‍ॅड. रुपाली पठारे, अ‍ॅड. रत्ना दळवी, अ‍ॅड. दिपाली झांबरे, अ‍ॅड. मीनाक्षी कराळे, अ‍ॅड. सविता साठे, अ‍ॅड. कोमल दळवी, अ‍ॅड. करुणा शिंदे, अ‍ॅड. मीना भालेकर, अ‍ॅड. निरुपमा काकडे, अ‍ॅड. रिझवाना शेख, अ‍ॅड. मुबिना जहागीरदार, अ‍ॅड. यास्मिन शेख, अ‍ॅड. निलोफर शेख, अ‍ॅड. सुविद्या तांबोळी, अ‍ॅड. विमल खेडकर, अ‍ॅड. आशा गोंधळे, अ‍ॅड. मीना शुक्रे, अ‍ॅड. प्राजक्ता करांडे, अ‍ॅड. स्वाती जाधव, अ‍ॅड. जोसना ससाणे, अ‍ॅड. स्नेहा लोखंडे, अ‍ॅड. ऐश्वर्या जंजाळे, अ‍ॅड. अर्चना गोसावी, अ‍ॅड. आरती पोखरणा, अ‍ॅड. पल्लवी बारटक्के, अ‍ॅड. ऋतुजा करमरकर, अ‍ॅड. शुभांगी भस्मे, अ‍ॅड. शिवानी सादिके, अ‍ॅड. चैताली खिलारी, अ‍ॅड. नंदिनी कुशवाह, सरकारी वकील अ‍ॅड. स्मिता लुहिया, अ‍ॅड. उताळे मॅडम, अ‍ॅड. सौ. बाबर, अ‍ॅड. मनीषा डूबे पाटील, अ‍ॅड. ज्योती ठुबे, अ‍ॅड. राणी भूतकर, अ‍ॅड. संजीवनी कुलकर्णी, अ‍ॅड. सुजाता पंडित, अ‍ॅड. झरीन पठाण आदींसह महिला वकील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे आभार अ‍ॅड. अरुणा राशीनकर यांनी मानले.

# श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाजाच्यावतीने १० फेब्रुवारीला भगवान विश्वकर्मा जयंती सोहळा

नगर - अहिल्यानगर जिल्हा विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज ट्रस्ट यांच्या वतीने १० फेब्रुवारी रोजी संस्थेच्या जागेत नवीन टिळक रोड, अहिल्यानगर येथे सायंकाळी ६ वाजता जयंती सोहळा होणार आहे. विशाल गणपती मंदिराचे बालयोगी संगमनाथ महाराज यांचे हस्ते तसेच संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ व समाज बांधव यांच्यावतीने भगवान विश्वकर्मा जयंती सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

सकाळी १० ते १२ वा. सत्यनारायण महापूजा श्री प्रभु विश्वकर्मा ग्रंथाचे वाचन व प्रभु विश्वकर्माची महाआरती होईल. तसेच दुपारच्या सत्रात दुपारी २ ते ५ या वेळेत संगीत भजनाचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमात कपिलेश्वर भजनी मंडळ, माळीवाडा, बुरुडगाव भजनी मंडळ, बुरुडगाव, सदा सुभद्रा भजनी मंडळ, नालेगाव इ. भजनी मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम होईल.

सायंकाळच्या सत्रात ५ ते ६ या वेळेत ह. भ. प. सत्यनारायण विश्वकर्मा यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होईल. तसेच सकाळी ६ वा. प्रभु विश्वकर्मा जयंती उत्सव कार्यक्रम होईल. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते दीप प्रज्वलन, संतांच्या प्रतिमेचे पूजन व प्रभु विश्वकर्माची आरती होईल.

कार्यक्रम संपल्यानंतर सायं.७ वा. महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

कार्यक्रमास सभासद, समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील कारागिर, बलुतेदार व सुतार समाजातील सर्व बंधु-भगिनींनी उपस्थित राहून भगवान विश्वकर्मा जयंती सोहळा कार्यक्रम साजरा करावा व उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर वाघमारे, सचिव राधाकृष्ण वाकचौरे, उपाध्यक्ष तुकाराम महामुनी, सहसचिव प्रभाकर वाघमारे, खजिनदार रावसाहेब वाघमारे, विश्वस्त सतीश क्षीरसागर, श्रीराज भागवत, अनिल मोरे, हरिभाऊ भालेराव, दिलीप गडकर, राजेंद्र क्षीरसागर यांनी केले आहे.

# तबला वादन परीक्षेत ओंकार चौकटे द्वितीय



नगर - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे नोव्हेंबर-डिसेंबर २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या सांगीतिक परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिवरंजन संगीतालयाचा ओंकार चौकटे हा विद्यार्थी तबला वादन हा विषय घेऊन मध्यमा पूर्ण परीक्षेत केंद्रात द्वितीय आला.

त्याला विद्यालयाचे संचालक सुरज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. ओंकार हा पेमराज सारडा वाणिज्य शाखेचा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आसून शिंदे मळा भागातील टेलर व्यावसायिक निलेश चौकटे यांचा मुलगा आहे.





श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमी, रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सावेडीतील नवीन समर्थ प्रशालेच्या सुमारे २५,००० स्क्वेअर फुट मैदानावर १००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी १०० शिक्षकांच्या मदतीने ११ हजार सूर्य नमस्कार व ११ हजार मनाचे श्लोक सादर केले. या सोहळ्याच्या उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार व धर्मशास्त्र अभ्यासक मंदारबुवा रामदासी यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले. (छाया - उदय जोशी)

# शालेय जीवनामध्ये सूर्यनमस्कार मूलभूत गरजांसारखे आहेत

### पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने समर्थ सूर्यनमस्कार सोहळा

नगर - शरीर आणि मन यांना आधुनिक काळामध्ये समृद्ध व संपन्न करण्यासाठी सूर्यनमस्कार आणि योगासने ही महत्त्वाची साधने बनलेली आहेत. बालवयापासूनच सुदृढ शरीरामध्ये निवास करणारे सुदृढ मन निर्माण करण्याकरिता सूर्यनमस्कारासारखा दुसरा उपाय नाही. मनाच्या श्लोकाच्या माध्यमातून ही लहान मुले संस्कार मंदिराच्या पायऱ्या चढण्यासाठी सज्ज झालेली आहेत. शालेय जीवनामध्ये सूर्यनमस्कार मूलभूत गरजांसारखे आहेत. देशातील जवळजवळ सर्वच अभ्यासक्रमांमध्ये सूर्यनमस्कार, योगासने मनाच्या सक्तीचे करण्याची वेळ आता आलेली आहे. त्यादृष्टीने श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने घेण्यात आलेला हा सोहळा निश्चितच प्रेरणादायी व आनंद देणारा आहे.

विद्यादानाचा यशस्वी सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमी, रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त आरोग्यदृष्ट्या संपन्न व समृद्ध विद्यार्थी घडविण्यासाठी सावेडीतील नवीन समर्थ प्रशालेच्या सुमारे २५,००० स्क्वेअर फुट मैदानावर १००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी १०० शिक्षकांच्या मदतीने ११ हजार सूर्य नमस्कार व ११ हजार मनाचे श्लोक सादर केले. या सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी श्री. पवार बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून धर्मशास्त्र अभ्यासक मंदारबुवा रामदासी, उद्योजक राजाभाऊ अमरापूरकर, तायगा शिंदे, मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, दासनवमी उत्सव समितीप्रमुख व मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. किशोर देशपांडे, सुनील जोशी, स्वप्निल कुलकर्णी, अ‍ॅड.वेद देशपांडे, सौ.संध्या कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ.वसुधा जोशी, मुख्याध्यापिका सौ.धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापक अजय महाजन, पर्यवेक्षक सुनील कानडे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रथमतः श्री समर्थ प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन, आकाशात भगवे फुगे सोडून सोहळ्याचे उद्घाटन झाले. ईशस्तवन सादर करून विद्यार्थिनींनी उपस्थित त्यांची मने जिंकली. तर अनोख्या सूर्यनमस्कार गीताने सर्वांना प्रेरित केले.

कार्यक्रमस्थळी सूर्यनमस्कार व मनाचे श्लोकविषयक वाचनीय माहितीपूर्ण फलक उभारण्यात आले होते. फुलांचे गालिचे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कलाशिक्षिका कु. स्वाती घुले यांनी तयार केलेल्या अनोख्या कार्यक्रम पत्रिकेचे विमोचन झाले. सौ. श्रुती कुलकर्णी, सौ. योगिता कुलकर्णी, सौ. शारदा होशिंग, सौ.अस्मिता कुलकर्णी यांनी मनाचे श्लोक सादर केले. योग विद्याधामचे साधक, मंडळाच्या सभासद रागिनी ओहोळ, श्रीमती स्वाती कुलकर्णी, श्रीमती स्मिता कुलकर्णी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सौ.संध्या कुलकर्णी यांनी केले तर आभार सुनील जोशी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.अमोल बागुल यांनी केले. सूर्यनमस्कार उपक्रमाचे संचालन पोपट लोंढे व संकेत शिंदे यांनी केले. विद्यार्थ्यांसाठी खाऊ व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या चारही शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



आनंद योग केंद्रात जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला.

## आनंद योग केंद्रात जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा

नगर – सावेडी येथील आनंद योग केंद्राच्या वतीने जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला. सावेडी येथील शुभ मंगल कार्यालयात पहाटे ६ वाजल्यापासून योग साधकांनी सूर्यनमस्कार घालण्यास सुरुवात केली. या उपक्रमास परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

आरोग्य निरोगी व सदृढ राहून जीवन आनंदी होण्यासाठी आनंद योग केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना निशुल्क योग, प्राणायामाचे धडे दिले जातात. सर्वसामान्य नागरिकांमध्ये योग व प्राणायामाची आवड निर्माण होण्याच्या हेतूने जागतिक सूर्य नमस्कार दिन साजरा करण्यात आला. जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या या उपक्रमात दीडशेपेक्षा जास्त योग साधकांनी सहभाग नोंदविला. उपस्थितांना निरोगी आरोग्यासाठी सूर्यनमस्काराचे फायदे सांगण्यात आले. सकाळी १० वाजेपर्यंत योग साधकांचे सूर्यनमस्कार सुरु होते. आप आपल्या क्षमतेप्रमाणे साधकांनी ५१, १०१, १५१ सूर्य नमस्कार पूर्ण केले. या उपक्रमासाठी योग केंद्राचे केंद्रप्रमुख दिलीप कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले.

# व्यायामाने शरीराबरोबरच मनाची स्थिती चांगली राहते

### डॉक्टर प्रिती सुरकुटला यांचे प्रतिपादन; पद्मशाली महिला शक्तीचा हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात



पद्मशाली युवाशक्ती, पद्मशाली महिलाशक्ती, पद्मनादम ढोल वाद्य पथक यांच्या संयुक्त विद्यमाने बालाजी मंदिर, श्रमिकनगर येथे महिलांसाठी हळदीकुंकू हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याप्रसंगी डॉ.प्रिती सुरकुटला यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

नगर – पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिला आपल्या आरोग्याकडे मात्र हवे तेवढे लक्ष देत नाहीत. स्त्रियांमध्ये संधिवात, डायबेटिस उच्च रक्तदाबाच्या तक्रारीही वाढत आहेत. महिलांनी रोजच्या व्यापातून आरोग्य सांभाळले पाहिजे. पोषक आहार घेतला पाहिजे, व्यायामाची सुद्धा आपल्या शरीराला आवश्यकता आहे. महिलांनी रोज अर्धा तास तरी व्यायाम केला पाहिजे. व्यायामाने शरीरा बरोबर मनाची स्थिती चांगली रहाते, असे प्रतिपादन डॉ.प्रिती सुरकुटला यांनी केले.

पद्मशाली युवाशक्ती, पद्मशाली महीलाशक्ती, पद्मनादम ढोल वाद्य पथक यांच्या संयुक्त विद्यमाने बालाजी मंदिर, श्रमिकनगर येथे महिलांसाठी हळदीकुंकू हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याप्रसंगी डॉ.प्रिती सुरकुटला यांनी महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी सनातन संस्थेच्या सौ. धनश्री शिंदे यांनी आनंदी जीवनासाठी साधना याविषयी व्याख्यान दिले. सौ.सोनालीताई दुलम, महिला शक्तीचे सुरेखाताई विद्ये आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात महिला शक्तीचे सुरेखताई विद्ये म्हणाल्या की, हळदी कुंकूला सामाजिक कार्यक्रमाची जोड मिळणे महत्वाचे आहे. कारण महिलांना अनेक विषयांवर मार्गदर्शनाची गरज आहे. महिलांना मार्गदर्शन मिळेल तर ते एक चांगली पिढी निर्माण करतील, याच उद्देशाने पद्मशाली महिला शक्तीच्यावतीने हळदी कुंकू कार्यक्रमात महिलांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन आयोजन करुन हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सौ.सोनालीताई दुलम यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला श्रमिकनगर येथील महिला उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता हळदी कुंकू आणि वान देऊन झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेखाताई कोडम, सरिकाताई सिद्धम, सुनंदाताई गंजी, रेणुकाताई जिंदम, उमाताई बडगु, सुनंदाताई रच्चा, नीता बल्लाळ, लक्ष्मीताई म्याना आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन सौ.सुनंदाताई गंजी यांनी केले. सौ. सुरेखाताई कोडम यांनी आभार मानले.

# सावेडीच्या मूकबधिर विद्यालयातील १० विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

### दिव्यांग विद्यार्थ्यांचे दैदीप्यमान यश

नगर – जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विळद घाट अहिल्यानगर येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व स्पेशल ऑलिंपिक्स भारत – महाराष्ट्र, अहिल्यानगर तसेच जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद व समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग (प्राथमिक), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शालेय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्हाभरातील सर्व मूकबधिर विद्यालयांनी सहभाग नोंदवला. यामध्ये सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी यश संपादन करत दहा सुवर्ण पदक, चार रौप्य पदक, दोन कांस्यपदकासह सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये समूहगीताला तृतीय क्रमांक मिळाला आहे. सुवर्णपदके मिळवलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली झाली आहे. या स्पर्धेचे बक्षीस वितरण जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मधुकर भावले, संचालिका विद्या भावले यांनी सन्मान करून त्यांचे कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापक दिलीप जगधने, बापूसाहेब डावरे, भाऊसाहेब धोंडगे, सरला जेजुरकर, प्रशांत पाडळे, आदींसह शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व स्पेशल ऑलिंपिक्स भारत – महाराष्ट्र, अहिल्यानगर तसेच जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद व समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग (प्राथमिक), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शालेय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. (छाया– समीर मन्यार)

यावेळी बोलताना मधुकर भावले म्हणाले की सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड जास्त असते त्यांना फक्त प्रोत्सानाची गरज असते. त्यांना प्रोत्साहन मिळाल्यास सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा चांगले यश ते संपादन करू शकतात. शासनस्तरावर त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी नेहमी विविध सांस्कृतिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून त्यांची कला जोपासण्याचे मोठे काम होत असून त्यांना प्रोत्साहन मिळत आहे. सर्वांनी मिळून त्यांना प्रोत्साहित करून त्यांच्या स्वतःच्या पायावर आपण उभा राहण्यासाठी मदत केल्यास त्यांचे भविष्य उज्वल होईल. येथे मूकबधिर विद्यालयांमध्ये शिक्षणाबरोबरच त्यांची कला जोपासण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असून त्यांना उद्योजकता कौशल्य विकास यावर शिक्षण दिले जाते. याचाच फायदा विद्यालयाला झाला आहे. विद्यालयाचे नाव विद्यार्थ्यांनी राज्य पातळीवर नेले आहे. त्याचा आम्हा सर्व शिक्षकांना सार्थक अभिमान असल्याचे ते म्हणाले.

क्रीडा स्पर्धेसाठी संदीप ढाकणे, रेवजी भांड तसेच सांस्कृतिक स्पर्धेसाठी शोभा भोंडवे, क्षितिजा पाडळे या शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले आहे.

स्पर्धेचा निकाल– सुवर्णपदक – ४०० मीटर धावणे– मयूर त्रिभुवन, अनुष्का राहींज., २०० मीटर धावणे– श्रावणी पालवे, सचिन लोंढे, अक्षदा गायकवाड., १०० मीटर धावणे –संग्राम साबळे., ५० मीटर धावणे –श्रीनाथ मदने, दिपाली तिवारी., लांब उडी– नितीन लांडगे., शॉर्ट जंप –कावेरी साबळे., रौप्य पदक– १०० मीटर धावणे व लांब उडी –कावेरी साबळे, श्रावणी पालवे (लांब उडी), शॉर्ट जंप –भक्ती वारंगुळे.

कांस्यपदक– ४०० मीटर धावणेव व लांब उडी–अनिरुद्ध जाधव., सांस्कृतिक कार्यक्रम व समूहगीताला तृतीय क्रमांक.

# नगरमध्ये ९ फेब्रुवारीला 'रायझिंग मॅरेथॉन' स्पर्धा

NAGAR RISING FOUNDATION
Celebrating Health

नगर – नगर रायझिंग मॅरेथॉन यंदा रविवारी (ता. ९) आयोजित करण्यात आली आहे. याचे आयोजन नगर रायझिंग फाउंडेशनने केले आहे. या स्पर्धेसाठी दोन हजारपेक्षा जास्त धावपटूंनी सहभाग नोंदविला आहे. यंदाचे हे नववे वर्ष आहे. टाईमपास फेम प्रथमेश परब सह मराठी अभिनेते व अभिनेत्री या स्पर्धेत आकर्षणाचा केंद्र ठरणार आहेत, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

ही मॅरेथॉन २१ किलोमीटर, १० किलोमीटर व ४ किलोमीटर अशा तीन कॅटेगरीजमध्ये होईल. स्पर्धेची सुरुवात अहमदनगर क्लब, अहिल्यानगर जवळील हत्तीच्या पुतळ्यापासून होईल. २१ किलोमीटरची मॅरेथॉन रविवारी (ता. ९) सकाळी ५.४५ वाजता, १० किलोमीटरची सकाळी ६.३० वाजता तर ४ किलोमीटरची मॅरेथॉन ७.३० वाजता सुरू होईल. मॅरेथॉन निमित्त रविवारी (ता. ९) पहाटे ५ वाजेपासूनच विविध फिटनेस कार्यक्रमांचे अहमदनगर क्लब, अहिल्यानगर मध्ये आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी (ता. ८) एक्स्पोमध्ये सहभागी होण्यासाठी सायंकाळी प्रथमेश परब येत आहे. तसेच रविवारी (ता. ९) एक राधा एक मीरा या आगामी फिल्म मधील गश्मीर महाजनी, मृण्मयी देशपांडे, सुरभी भोसले आणि संदीप पाठक हे कलावंत उपस्थित राहणार आहेत. तसेच सोनी मराठीवरील बहुचर्चित असणारा 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातील पृथ्वीक प्रताप आणि दत्तू मोरे हे सध्या गाजणारे चेहरे मॅरेथॉनच्या उद्घाटनाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेसाठी सहभागी स्पर्धकांची किट शनिवारी (ता. ८) दुपारी १ ते सायंकाळी ८ या वेळेत अहमदनगर क्लब येथे मिळणार आहे.


## जाहीर नोटीस दुरुस्ती

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता. अहिल्यानगर पैकी, मे. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील **मौजे नवनागापूर येथील सर्व्हे नं. ४९/१ब/१क१/१क२ मधील प्लॉट नं. १५ याचे एकूण क्षेत्रफळ ६००.०० चौ. मी. व यावरील असलेले शेड व आर सी सी बांधकाम क्षेत्र ३१०.५० चौ. मी. ही मिळकत.** या मिळकतीबाबत नवा मराठा या वर्तमानपत्रात **दिनांक २०/०१/२०२५** रोजी नोटीस प्रसिध्दीस दिलेली असून सदर जाहीर नोटीसीमध्ये नजरचुकीने व टायपिंग मिस्टेकमुळे **मिळकतीचे वर्णन चुकीचे लिहिण्यात** आले होते ते या दुरुस्ती नोटीस द्वारे दुरुस्त करीत आहे. **मौजे नागापूर येथील सिटी सर्व्हे नं. २३९ (मौजे नवनागापुर येथील सर्व्हे नं. ४९/१ब / १क१ / १क२ मधील प्लॉट नं. १५) याचे एकुण क्षेत्रफळ ६००.०० चौ. मी. व यावरील आर सी सी बांधकाम व शेड याचे एकुण क्षेत्र ३१०.५० चौ. मी. ही मिळकत** अशी दुरुस्ती आहे. यापुढे दुरुस्ती नोटीस प्रमाणे नोटीस वाचण्यात यावी. सदर दुरुस्तीची नोटीस तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

अहिल्यानगर
दिनांक : ०५/०२/२०२५

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मधील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक **श्री.नरेंद्र अन्जय्या दुलम,** रा. तोफखाना, अहमदनगर यांनी सदर मिळकतीबाबत आमचे आशिला बरोबर सौदा करुन सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल केले आहे. त्यानुसार, सदरची मिळकत निर्वेध्य, निजोखमी असल्याचा हवाला विद्यमान मालक श्री.नरेंद्र अन्जय्या दुलम यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. तसेच आमचे विरहीत इतर कोणाबरोबरही कोणताही व्यवहार केलेला नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. सदरची मिळकत आमचे पक्षकारांनी बैठक घेवुन बाजारभावाने योग्य किंमत ठरवुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तरी, या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालु असल्यास अथवा गहाणखत, दान, बक्षीस पत्र, अव्वल जप्ती बँक / पतसंस्था बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट, बेनामी अगर इतर कोणताही वाद असल्यास संबंधितांनी अस्सल कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळावावे व आमची खात्री करुन द्यावी. सदरचे व्यवहारास कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे व्यवहारास, खरेदीस कायदेशीररित्या कोणाचीही काहीही हरकत नाही असे कायदयानुसार समजण्यात येवुन आमचे आशिल नमुद मिळकतींचे ठरविण्यात आलेला खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. या जाहिर नोटीसची मुदत संपले नंतर आलेल्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. त्यानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

**- परिशिष्ट मिळकतीचे वर्णन -**

डि.।। अहमदनगर सब डि. ।। तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर नगर येथील परदेशी गल्ली, तोफखाना भागातील खालील वर्णनाची मिळकत –

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. |
| --- | --- |
| ५०३ | १२१.२ चौ.मी. |

ही संपुर्ण जागा व यावरील ८० वर्षे जुने असलेले सागवाणी लाकडे व वर पत्र्याचे छत असलेले बांधकाम २३३.३१ चौ.मी. यापैकी पुर्व बाजुकडील क्षेत्र ३९.४८४ चौ. मी. ही जागा व त्यावरील ८० वर्षे जुने सागवाणी लाकडे व वर पत्र्याचे छत असलेले बांधकाम क्षेत्र ७८.०० चौ. मी. ही संपुर्ण मिळकत श्री. नरेंद्र अन्जय्या दुलम यांना सदर वाटणी पत्रान्वये मालकी हक्काने कायमस्वरुपी मिळालेली आहे.

**यांसी चर्तु:सिमा महसुल रेकॉर्डप्रमाणे**
पूर्वेस : बोळ — दक्षिणेस : सिटी सर्व्हे नं. ५०४ (विठ्ठल मंदिर)
पश्चिमेस : सि.स.नं. ५०३ पैकी उर्वरित क्षेत्र — उत्तरेस : सि.स.नं. ५०२ (मेरगु यांची मिळकत)
येणेप्रमाणे चर्तु:सिमापुर्वक तदंगभुत वस्तुसह व वागणुकीचे व इतर हक्कांसह काही एक राखुन न ठेविता असलेली बांधकामासह मिळकत.

ता. ०५/०२/२०२५
अहमदनगर

**ॲड. विजय आर. गुंदेचा**
(बी.कॉम., एल.एल.एम., सी.एस., डी.टी.एल.,
डी.एल.एल ॲण्ड एल.डब्लु., जी डीसी ॲण्ड ए.)
**ॲड. किमया वि. गुंदेचा**
(बी.एस.एल., एल एल.बी., जी डीसी ॲण्ड ए.)
ॲडव्होकेटस्
२०८, करण कोर्ट बिल्डींग, तळमजला, जुने जिल्हा न्यायालय समोर,
अहमदनगर मोबा.नं. ९८९०९०१११७


# सारसनगरच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात मराठी संस्कृतीचा जागर

### प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपचा रंगला कार्यक्रम; विविध स्पर्धांचा महिलांनी लुटला आनंद

नगर – प्रयास व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने मराठी संस्कृतीचा जागर करुन पारंपारिक पध्दतीने हळदी–कुंकूचा कार्यक्रम पार पडला. पारंपारिक वेशभूषेत महिला उत्स्फूर्तपणे या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा महिलांनी आनंद लुटला. सारसनगर येथील श्री वर्धमान जैन श्रावक संघाच्या सभामंडपात पार्वती जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हळदी–कुंकूचा कार्यक्रम रंगला होता. यावेळी गीता पर्वते, योगिता पर्वते, अहिल्या पर्वते, एकता पर्वते, मनिषा पर्वते, आरती भुतडा, सुरेखा भोसले, छाया राजपूत, प्रयास ग्रुपच्या संस्थापिका अलकाताई मुंदडा, ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी, उषा सोनी, प्रतिभा भिसे, अनिता काळे, मिरा पोफलिया, सीमा बंग, पुष्पा मालू, आशा निंबाळकर, अरुणा गोयल, रेखा फिरोदिया, हिरा शहापुरे, ज्योती गांधी, हेमा पडोळे, उषा सोनटक्के आदींसह ग्रुपच्या महिला उपस्थित होत्या.



प्रयास व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने मराठी संस्कृतीचा जागर करुन पारंपारिक पध्दतीने हळदी–कुंकूचा कार्यक्रम पार पडला.

प्रास्ताविकात अलकाताई मुंदडा यांनी महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

रजनी भंडारी यांनी फक्त हळदी–कुंकूचा कार्यक्रम न करता महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले असून, ग्रुपच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीन विकासावर वर्षभर भर दिला जात असल्याचे त्या म्हणाल्या.


पार्वती जगताप म्हणाल्या की, संस्कृतीचा वारसा महिलांमुळे जपला जात आहे. कार्यक्रमात एकत्र येताना महिला संस्कार व संस्कृतीचा जागर करत असून, त्यांच्यामुळे संस्कारी पिढी घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

गीता पर्वते म्हणाल्या की, महिलांनी आपल्या संस्कृती जोपासून वाटचाल केल्यास भविष्यातील प्रश्नांना सामोरे जाता येणार आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणाने युवा पिढीचे भवितव्य धोक्यात असून, यावर भावी पिढीला संस्काराने मात करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजन, कौशल्यात्मक व बौध्दिक स्पर्धा रंगल्या होत्या. दिपा मालू यांनी विविध स्पर्धा घेतल्या. विजेत्या महिलांना उपस्थितांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. बक्षीसांसाठी सिमा बंग, पुष्पा मालू, मिरा पोफलिया, छाया राजपूत, विठ्ठल भुतडा यांचे प्रायोजकत्व लाभले. पर्वते परिवाराच्या वतीने महिलांना उन्हाळ्यानिमित्त पाण्याचे बॉटल वाण म्हणून देण्यात आले. रजनी भंडारी यांच्या वतीने सर्व महिलांना स्नेह भोजन देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी लोढा यांनी केले. आभार अरुणा गोयल यांनी मानले.

# श्री एकदंत मंडळातर्फे गणेश जयंती विविध उपक्रमांनी साजरी

नगर – श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने गणेश जयंती विविध धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावर्षी २१ वे वर्ष असल्याने संपूर्ण परिसर श्री क्षेत्र तिरुमल्ला तिरुपती बालाजी सारखे रुप आकर्षक सजावट करण्यात आले होती. यामध्ये श्री एकदंत मंदिरास प्रति बालाजी मंदिर बनविण्यात आले होते. जसे भगवान श्री बालाजी मंदिरात सात व्दार आहेत. तसेच सात व्दार परिसरात उभारण्यात आले होते. १० फुटी भगवान बालाजीची मुर्ती दर्शनास ठेवण्यात आली होती. श्री एकदंत मंदिरात गणपतीला भगवान बालाजी सारखे सजविण्यात आल्याने भाविकांना श्री गणेशाबरोबरच श्री बालाजी भगवानचे ही दर्शन झाले. भाविकांना तिरुपती बालाजी सारखा लाडूचा प्रसाद देखील देण्यात आला.



यावेळी आपलेल्या सर्व भाविकांना चंदनाचा बालाजी टिळा लावण्यात आला. तसेच दक्षिणा हूंडी ठेवण्यात आले. ध्वजास्तंभम उभारुन पारंपारीक पद्धतीने विधीवत पुजा करण्यात आली. संपुर्ण परिसरात दक्षिणात्य रांगोळी देखील काढण्यात आली. यावेळी भाविकांसाठी दक्षिणात्य महाप्रसाद बनविण्यात आला होता. यामध्ये दहीभात, अंबटभात, मसालाभात, पुरीभाजी, शिरा, पापड आदींचा समावेश होता. कार्यकर्त्यांनी आपले केस अर्पण केल्यामुळे तसेच दक्षिणात्य पोशाख परिधान केल्यामुळे एक वेगळीच रोनक यावेळी दिसून येत होती. संपूर्ण परिसर गणपती बाप्पा मोरया बरोबरच बालाजी भगवानाच्या जय घोषाने दुमदुमला होता. या सोहळ्यात सर्व जाती धर्मातील लोकांनी उपस्थित राहुन या सर्व उपक्रमांचा लाभ घेतला.

गणेश जयंतीला श्री गणेश मंदिरात श्री विघ्नेश्वर पुजन व श्री गणपती अथर्व शिर्षण, नाममुर्ती अभिषेक, होमहवन, श्री मुर्ती मिरवणुक व पूर्णाहुती, श्री सत्यनारायण महापूजा, श्री महाप्रसाद व बाल मेळाव्याने गणेश जयंतीची सांगता झाली. मिरवणुकीत महिला सहभागी झाल्या होत्या. महिलांनी एकसारख्या साड्या परिधान करुन पद्मशाली समाजातील प्रसिद्धे असलेले पारंपारिक बात्कम्मा, लेझिम खेळ खेळत सहभागी झाले होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी देखील लेझिम, लाठी काठी खेळ खेळेत या मिवणुकीत रंगत आणली होती. त्यामुळे सर्वाचे लक्ष वेधले गेले. महाआरतीने या जयंती उत्सवाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी एकदंत गणेश मंडळ, एकदंत महिला बचत गट, एकदंत परिवार, एकदंत युवा ग्रुपच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.


## ग्रामपंचायत पोखरी ब – १ निविदा नोटीस

ग्रामपंचायत पोखरी ता.पारनेर यांचेकडून खालील कामाचे जिल्हा परिषद सा. बा विभाग अहमदनगर यांचेकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | योजना | निविदा फी | निविदा रक्कम | बयाना रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | मौजे पोखरी ता. पारनेर येथे शौचालय बांधकाम करणे | स्वच्छ भारत मिशन | २३६/– | २६२७०२/– | २६२७/– | सुबेअ |

निविदा फॉर्म व कामाच्या अटी शर्ती बाबतची माहिती ग्रा. पं. पोखरी कार्यालयात ०५/०२/२०२५ ते १२/०२/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. सीलबंद निविदा दि. १२/०२/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया १३/०२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा ग्रा.पं पोखरी येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) PAN CARD ३) ITR ४ ) जिएसटी प्रमाणपत्र. ५) प्रतिज्ञापत्र १०० स्टॅम्प

ग्रामसेवक — सरपंच
ग्रामपंचायत पोखरी — ग्रामपंचायत पोखरी


# हुंड्यासाठी छळ करुन विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी ५ जण निर्दोष

नगर – जळका, ता. नेवासा येथे दि. २५/०१/२०१७ रोजी फिर्यादीची मयत मुलगी वय वर्ष २२ हिचे लग्न दिड वर्षापुर्वी आरोपी क्र. १ संभाजी रामदास नजन यांचेशी झाले होते. लग्नामध्ये हुंडा म्हणून २,५०,०००/– रुपये देण्याचे ठरले होते. त्यावेळी फिर्यादीने १,००,०००/– रुपये आरोपींना दिले होते. परंतू उर्वरीत रक्कम हि फिर्यादीची परिस्थिती हलाखीची असल्याने सासरच्या लोकांना वेळेत देऊ शकले नाहीत. याचा राग मनात धरुन आरोपी नंबर १. संभाजी रामदास नज़न (पती) याने मयतास एक दोन वेळेस मारहाण केली व आरोपी नंबर २ गणेश रामदास नजन (दिर), ३. निर्मला उर्फ उषा गणेश नजन (जाव) यांनी मयतास वारंवार घालून पाडून बोलून शिवीगाळ केली तसेच आरोपी नंबर ४ गयाबाई रामदास नजन (सासू), आरोपी नंबर ५ रामदास जनार्धन नजन (सासरा) यांनी तिला वेळोवेळी उपाशी ठेवून तिच्याकडे व तिच्या लहान मुलीकडे दुर्लक्ष केले. सर्व आरोपींनी मयत हिला मानसिक व शारिरीक त्रास देऊन विषारी औषध घेण्यास प्रवृत्त केले तसेच मयताने घेतलेल्या औषधाची बाटली नष्ट करुन पुरावा नष्ट केला म्हणून यातील सर्व पाचही आरोपींच्या विरुध्द फिर्यादीच्या फिर्यादीवरुन नेवासा पोलिसांनी सर्व आरोपी राहणार जळका, ता. नेवासा यांचे विरुध्द भा.दं.वि. कलम ३०४(ब), ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असता, त्याची चौकशी नेवासा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश क्र. २ हरिभाऊ वाघमारे यांचे समोर होऊन त्यात सर्व पाचही आरोपींची नुकतीच निर्दोष मुक्तता करण्यात आली.

सर्व आरोपींतर्फे अहमदनगर येथील जेष्ट विधिज्ञ ॲड. सतिशचंद्र वि. सुद्रीक यांनी काम पाहिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# तो वाट पाहतो



*सभोवती तळे साचले तरी शाळा सुरू*
*चकचकीत वर्गांमध्ये पाऊस पाहे शिरू*

*कुठे गेले सवंगडी शोधतो तो*
*इवली पावले नाचत नाहीत म्हणून*
*हिरमुसतो तो*

*आता तरंगत नाहीत होड्या*
*पन्हाळीतल्या पाण्यात*
*तो वाट पाहत राहतो*
*कोणी येईल का दारात?*

## कॅलिडोस्कोप

# सेल्फीतून कमाईची रशियन आयडिया!




अनेक लोकांना परदेशी लोकांसोबत फोटो काढण्याची किंवा सेल्फी घेण्याची भारी हौस असते; मात्र भारत दौऱ्यावर आलेल्या एका रशियन महिलेने त्यातून कमाईचा एक नवा मार्ग शोधला. ही रशियन महिला सेल्फी काढण्यासाठी स्थानिक लोकांकडून शंभर रुपये घेत असल्याचे आढळल्याने चर्चेला तोंड फुटले. एका व्हायरल व्हिडिओमध्ये भारतात प्रवास करत असलेल्या रशियन महिलेला स्थानिकांकडून सतत सेल्फीच्या विनंतीला सामोरे जावे लागत होते. परिणामी, तिने प्रत्येक सेल्फीसाठी शंभर रुपये आकारायला सुरुवात केली. त्या महिलेने फोटो काढण्याच्या हट्टापासून वाचण्याचा मार्ग शोधला खरा; परंतु त्यातून तिला उत्पन्नाचा नवा मार्ग सापडला. व्हिडीओच्या सुरुवा–तीला ती सेल्फीची नक्कल करत म्हणते, मॅडम, प्लीज, एक फोटो? एक फोटो? मग ती एक साइन बोर्ड काढते आणि लोकांसमोर धरते. त्यावर एक सेल्फी, शंभर रुपये असे लिहिलेले असते.

हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आल्यापासून लाखो लोकांनी तो पाहिला. सोशल मीडिया यूजर्स व्हिडीओबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, प्रातिकराची मागणी होत असल्यास काळजी करू नका. तर दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, तुम्हाला इन्कम टॅक्स विभागाकडून नक्कीच कॉल येईल.

# हमाल बनला आयएएस!

मोबाईल फोनमुळे मुले बिघडतात, असे म्हटले जाते; पण मोबाईल फोनचा योग्य वापर केला तर तो केवळ मुलांनाच नाही तर प्रौढांनाही काही चांगल्या कामात मदत करू शकतो, हे एका हमाल काम करणाऱ्याने सिद्ध केले. त्यांनी मोबाईल फोनच्या मदतीने केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली. आयएएस श्रीनाथ के. यांची यशोगाथा अविश्वसनीय आहे. श्रीनाथ के. केरळमधील मुन्नारचे रहिवासी आहेत आणि एर्नाकुलममध्ये हमाल म्हणून काम करत होते. एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेले श्रीनाथ रेल्वे स्टेशनवर अधिकृत पोर्टर म्हणून काम करत होते. ते त्यांच्या कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य होते.



२०१८ मध्ये, वयाच्या २७ व्या वर्षी त्यांना जाणवले, की हमाल म्हणून काम केल्याने कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळत नाही. त्या वेळी त्यांना एक वर्षाची मुलगी होती. तिला ते आयुष्यातील अडचणींपासून वाचवू इच्छित होते. त्यांना तिचे बालपण चांगले जावे अशी इच्छा होती, म्हणून त्याने एक चांगला मार्ग निवडण्याचा निर्णय घेतला. आपले उत्पन्न चालू ठेवण्यासाठी त्यांनी रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्यास सुरुवात केली. रोज ४००–५०० रुपयांपर्यंत मिळणाऱ्या उत्पन्नावर ते समाधानी नव्हते. तेव्हा त्यांच्या मनात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्याचा विचार आला. त्यांच्याकडे कोचिंग किंवा ट्यूशनसाठी पैसे नव्हते. त्यांनी उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा वापर करण्याचा निर्णय घेतला आणि सिव्हिल सर्व्हंट होण्याचे स्वप्न सोडले नाही.

२०१६ मध्ये सरकारने मोफत वायफायची सुविधा सुरू केली, तेव्हा श्रीनाथ यांनी त्याचा फायदा घेण्याचे ठरवले. त्यांच्याकडे मोबाईल फोन आणि मोफत वायफाय कनेक्शन होते. त्यामुळे त्यांना स्वप्न पाहण्याची आणि त्याचे ध्येय साध्य करण्याची प्रेरणा मिळाली. पहिल्या प्रयत्नात ते केरळ लोकसेवा आयोगाची आणि चौथ्या प्रयत्नात केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले.

# सुंदर तरुणीचे साध्वीसारखे जगणे!

उत्तर प्रदेशमधील महाकुंभाच्या पर्वात भारतासह जगभरातील भक्त, साधूसंत सहभागी झाले. याच महाकुंभादरम्यान एका सुंदर तरुणीची चर्चा सुरु होती. ही तरुणी आपण साध्वी असल्याचे सांगत असल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्याने तिचे नशीब बदलून टाकले.

महाकुंभाच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच सोशल मीडियावर तिचा व्हिडीओ व्हायरल झाला. या व्हिडीओमध्ये ती तरुणी आपण ३० वर्षांची असल्याचे सांगते. गेल्या दोन वर्षांपासून ती एका साध्वीप्रमाणे जीवन जगत आहे. या तरुणीचे खरे नाव हर्षा रिछारिया असे आहे. या व्हिडीओमध्ये, मी याआधी अँकरिंग केले आहे. सोबतच अभिनय वगैरे केला असून आता साध्वीचे जीवन जगत आहे, असे तिने सांगितले. ही तरुणी एवढी सुंदर असूनही एखाद्या साध्वीप्रमाणे जगत असल्याचे समोर आल्यानंतर तिची सगळीकडे चर्चा झाली.



व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर ती साध्वी असल्याच्या दाव्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. ती इन्स्टाग्राम तसेच इतर सोशल मीडिया साईट्सवर सक्रिय असते. इन्स्टाग्रामवर तर तिला अनेक लोक फॉलो करतात. असे असताना तिला साध्वी कसे म्हणावे, असा प्रश्न काही लोकांनी उपस्थित केला. इन्स्टाग्राम वरील बायोनुसार ही तरुणी आचार्य महामंडलेश्वर स्वामी श्री कैलाशनंदगिरी महाराज यांची शिष्या आहे. ती साध्वी आहे की नाही याबाबत मतमतांतरे आहेत; मात्र काही सेकंदांच्या व्हायरल व्हिडीओने या तरुणीचे नशीब पालटले आहे. ती काही तासांमध्ये संपूर्ण देशात प्रसिद्ध झाली. प्रकाशझोतात येण्याआधी इन्स्टाग्रामवर तिचे साडे सहा लाख फॉलोअर्स होते; मात्र महाकुंभमेळ्यातील वेगवेगळे व्हिडीओ समोर आल्यानंतर नेटकऱ्यांनी तिचे इन्स्टाग्राम खाते सर्च करून फॉलो करण्यास सुरुवात केली. त्याचाच परिणाम म्हणून या तरुणीचे इन्स्टाग्रामवरील फॉलोअर्स एका रात्रीत दहा लाखांच्या पुढे गेले. म्हणजेच अवघ्या काही तासांमध्ये या तरुणीला सुमारे चार लाखांपेक्षा जास्त लोकांनी इन्स्टाग्रावर फॉलो केले.

# इथे लपून बसा!

अमेरिकेतल्या ओक्लाहोमा शहरातल्या वोर्टेक्स वॉल्ट या कंपनीने अनोखा पलंग तयार केला. अत्याधुनिक सोयी–सुविधांनी युक्त असा हा पलंग वेळप्रसंगी आपला जीवही वाचवू शकतो. या पलंगात आपण लपू शकतो. भूकंप, पूर, वादळ अशा प्रसंगांमध्ये आपण या पलंगाच्या आत सुरक्षित राहू शकतो. हा पलंग तयार करण्यासाठी अत्यंत कठोर अशा स्टीलचा वापर करण्यात आला असून तो तुटत नाही. पलंगाच्या किनाऱ्यालगत तीन छोटे दरवाजे आहेत. हे दरवाजे उघडून आपण आत जावून बसू शकतो. याला शेल्टर बेड हे नाव देण्यात आले. रिमोटचा वापर करून हा पलंग उघडता आणि बंद करता येतो. पलंगात चार मोटर सीजर लिफ्ट मॅकेनिझम बसवण्यात आले. वीज नसताना बॅटरी बॅकअप मिळू शकतो. नैसर्गिक आपत्तीदरम्यान पलंग उघडता आला नाही तरी रांगत त्याच्या आत लपण्याची सोय आहे.



# स्टंट की माणुसकी?



एखाद्या दुचाकीमधील पेट्रोल संपले, की माणुसकीच्या भावनेतून दुसरा दुचाकीस्वार त्याला मदत करतो. अनेकदा रस्त्यावर, गावात, शहरात दुचाकीला पायाने धक्का देत दुसरा दुचाकीस्वार पेट्रोल पंपापर्यंत किंवा इच्छित स्थळापर्यंत पो–होचवतो; मात्र चक्क बसमधील वाहकाने आपला पाय बाहेर काढून एखाद्या रिक्षाला धक्का देत माणुसकी दाखवली. मात्र ही माणुसकी होती की स्टंट असाही प्रश्न अनेकांना पडला.

बसच्या वाहकाने स्वत:च्या आणि प्रवाशांच्या जीव–ाशी खेळ केल्याची तक्रार अनेकांनी केली. त्यानंतर, संबंधितावर कारवाई करण्यात आली. चालत्या बसच्या दारात उभे राहून रिक्षाला धक्का मारण्याची स्टंटबाजी सिटीलिंक बसच्या वाहक–चालकांच्या चांगलीच अंगलट आली असून दोघांनाही निलंबित करण्यात आले. नाशिकमधील बस आणि रिक्षाचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर परिवहन विभागाने संबंधित बसच्या चालक–वाहकावर कारवाई केली.

बसमधील वाहक बसच्या फुटस्टेपवर एक पाय ठेऊन उभे राहून दुसऱ्या पायाने रिक्षाला धक्का देत असल्याचे व्हिडिओमध्ये दिसून येते. रिक्षावाल्याच्या मदतीसाठी त्याने एक पाय आणि एक हात लावला. बसमधील वाहकाने जीव धोक्यात घालून माणुसकीच्या भावनेतून रिक्षाला धक्का मारतानाचा व्हिडीओ व्हायरल होताच सिटीलिंकच्या कारभाराबाबत टीका सुरू झाली.

या प्रकारावर बसमधील प्रवाशांसह स्वत:च्या जीव–ाशीही खेळ होत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. मागील आठवड्यातच सिटीलिंक प्रशासनाने पोलिसांना पत्र लिहून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या, भरधाव बस चालवणाऱ्यांचे व्हिडीओ मागवले असताना हा प्रकार उघडकीस आल्याने तत्काळ संबंधित बसचालकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

# कॅन्सचा असाही पुनर्वापर

पर्यावरणाचा बचाव करण्यासाठी विविध वस्तूंचा पुनर्वापर करण्याची गरज व्यक्त होते आहे. अनेकजण असा पुनर्वापर करत असतात. या बाबतीत आपण चीनमधला एक शेतकरी दाई चँगलिनचं उदाहरण समोर ठेऊ शकतो. दाई कोल्डड्रिंक आणि बीअरच्या कॅन्सपासून खेळणी तयार करतो. तो फक्त पाच रुपयांना कॅन खरेदी करतो. त्यापासून खेळणी तयार करतो आणि भारतीय चलनात पाच हजार रुपयांना विकतो. त्याने गेल्या पाच वर्षांमध्ये कॅन्सपासून आठ हजार विमानं आणि गाड्या तयार केल्या आहेत. दाई चीनमधल्या हेनात प्रांतातल्या लुयोनिंग शहरात रहातो. विविध पेयांचे कॅन्स तो विकत घेतो. त्याच्याकडे असंख्य कॅन्स आहेत. शेतीच्या कामातून वेळ काढून तो हे काम करतो. अशाप्रकारे खेळणी बनवल्याने कचऱ्याचं प्रमाण खूप कमी होतं. कॅन्सपासून खेळणी बनवण्यासाठी तो बरीच मेहनत घेतो. विविध प्रकारची तंत्र वापरतो. त्याच्या या कामाचं चीनमधून खूप कौतुक होतं. आपणही अशा पद्धतीने कचऱ्याचं प्रमाण कमी करू शकतो.



# असा निधी जमवला



बंगळूरुतल्या विद्याशिल्प अकादमीतल्या विद्यार्थ्यांनी विधायक कामासाठी पुढाकार घेतला. त्यांनी ज्येष्ठांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी निधी गोळा करून अनेकांपुढे आदर्श उभा केला. अकादमीच्या ११० विद्यार्थ्यांनी मिळून हा निधी उभा केला. या उपक्रमाची सुरूवात चार विद्यार्थ्यांनी केली होती. ३५८० ज्येष्ठांसाठी त्यांनी निधी गोळा केला. ती रक्कम ३५ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी फक्त दहा दिवसात ही कामगिरी करून दाखवली. सुरूवातीला २४०० ज्येष्ठांसाठी २२ लाख रुपये निधी जमवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र नंतर हा आकडा वाढवण्यात आला. क्राउड फंडिंगच्या माध्यमातून हा निधी उभा राहिला. सुरूवातीच्या टप्प्यात चार विद्यार्थ्यांनी एक लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमवली. खुशी कर्मकार, गायत्री थम्पी, मिहिका आणि करण ददलानी या विद्यार्थ्यांनी ही मोहीम राबवली होती. त्यानंतर नववी, दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनीही यासाठी पुढाकार घेतला. या शाळेतले विद्यार्थी सामाजिक कार्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात. विद्यार्थ्यांच्या या कार्याचं आणि त्यांना मदत देणाऱ्यांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.

# कॅसिनो नाही, डे केअर सेंटर!

जपानसारख्या देशात ज्येष्ठांची संख्या झपाट्याने वाढत होती. त्यांची काळजी, देखभालीचे प्रश्न ऐरणीवर आले होते. म्हणूनच टोकियोमध्ये ज्येष्ठांसाठी डे केअर सेंटर तयार करण्यात आलं. सर्व्हिस लास वेगास नावाने हे डे केअर सेंटर चालवलं गेलं. इथे ज्येष्ठांच्या करमणुकीची सर्व सुविधा उप–लब्ध करून दिली गेली. कॅसिनो थीवर आधारित या डे केअर सेंटरमध्ये विनिंग फॉर्म्युला मशीन्स बसवण्यात आली. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक गेम्स खेळू शकतात. जपानमध्ये जुगारावर बंदी आहे. कोणीही पैसे लावून जुगार खेळू शकत नाही. मात्र आपण फक्त आनंदासाठी इथे गेम्स खेळत असल्याचं ज्येष्ठ नागरिक सांगतात. जपानमध्ये ज्येष्ठांची संख्या वाढत चालल्याने अनेकांना एकाकी आयुष्य व्यतीत करावं लागतं. त्यांचा एकटेपणा दूर करण्यासाठी कॅसिनो थीमवर आधारित डे केअर सेंटर सुरू करण्यात आलं. ज्येष्ठ नागरिक अशा ठिकाणी निवांत वेळ घालवू शकतात. ज्येष्ठांसाठीचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.



# तंदुरूस्तीचं महत्त्व कळावं म्हणून...

मॉस्कोतल्या मेट्रोतून मोफत प्रवास करू शकता. पण यासाठी तुम्हाला एक काम करावं लागेल. ३० जोरबैठका काढणाऱ्या प्रवाशांना मेट्रोतून मोफत प्रवास करता येणार आहे, अशी मोहीम सुरू करण्यात आली होती. लोकांच्या तंदुरूस्तीसाठी ही मोहीम सुरू करण्यात आली होती. अर्थात दोन मिनिटांमध्ये ही कामगिरी करून दाखवायची होती. अशी कामगिरी करणाऱ्यांना मेट्रोतल्या मोफत सफरीचा आनंद लुटता येईल. या घटनेचा व्हिडिओही व्हायरल झाला. मोफत तिकिटाची संधी मिळवण्यासाठी अनेक लोक जोरबैठका काढत होते. तिकिट वेंडिंग मशीनलगत ३० जोरबैठका काढल्यानंतर तुम्हाला मोफत तिकिट मिळतं. रशियामधले लोक स्थूलपणाच्या बाबतीत आघाडीवर आ–हेत. त्यामुळे इथलं सरकार लोकांना तंदुरूस्त बनवण्याच्या आणि व्यायामाचं महत्त्व पटवून देण्याच्या प्रयत्नात आहे. लोकांनी व्यायामला सुरूवात करावी यासाठी अधूनमधून असे उपक्रम राबवले जातात. २०१५ मध्ये स्क्वॉट्स केल्यानंतर लोकांना सब वेचं तिकिट मोफत देण्याची योजना होती.



# दहावी-बारावी बोर्ड परीक्षेंच्या सर्वच केंद्रावर सरमिसळ पध्दतीला विरोध दर्शवून अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघटनेतर्फे 'ठिय्या आंदोलन'

**एकही कॉपी केस नसताना केंद्र संवेदनशील कसे? शिक्षकांचा प्रश्न!, स्टेशनरी वाटपच्या बैठकीवर बहिष्कार टाकून केले निदर्शने**

नगर – जिल्ह्यातील दहावी–बारावी बोर्ड परीक्षेच्या सर्वच केंद्रावर सरमिसळ पध्दतीला विरोध दर्शवून, अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघटनेच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. न्यू आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात मंगळवारी (दि.४ फेब्रुवारी) बोर्डाच्या परीक्षेसाठी स्टेशनरी वाटप संदर्भात झालेल्या बैठकीवर बहिष्कार टाकून जिल्ह्यातील केंद्र संचालकांनी संघटनेच्या माध्यमातून ठिय्या आंदोलन केले होते.

या आंदोलनात जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, मिथुन डोंगरे, बालाजी गायकवाड, लक्ष्मीकांत नांगरे, विजय नरोटे, अंशुमन वाकचौरे, जयश्री सरवदे, बाळासाहेब खिलारी, कैलास मोकळे, जे.के. नरवडे, एस.ए. शेख, बी.ए. पारखे आदींसह जिल्ह्यातील केंद्र संचालक शिक्षक सहभागी झाले होते.

नुकतेच होणाऱ्या दहावी–बारावी बोर्ड परीक्षा संदर्भात शिक्षक आमदार व संघटनेच्या मागणीनंतर जिल्ह्यामध्ये परीक्षेत दरम्यान सरमिसळ करण्यासंदर्भात सर्व संघटनांनी विरोध दर्शविला आहे. हा निर्णय स्थगित करण्याची मागणी सर्व शिक्षक वर्गातून होत आहे. सर्व तालुक्यांमध्ये संवेदनशील सेंटरच्या नावाखाली केंद्र संचालक, पर्यवेक्षक यांची हेळसांड सुरू केली आहे. तथापि हा निर्णय रद्द होऊन सुद्धा संवेदनशीलतेचा



जिल्ह्यातील दहावी–बारावी बोर्ड परीक्षेच्या सर्वच केंद्रावर सरमिसळ पध्दतीला विरोध दर्शवून, अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघटनेच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

काय निकष लावला? कोणते धोरण ठरविले? याची माहिती दिलेली नाही. ज्या सेंटरवर अद्यापही कॉपीचे एकही कारवाई झालेली नाही, अशा ठिकाणी सुद्धा सेंटर बदलायचे आदेश आले असून, हा चुकीचा प्रकार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

हा प्रकार न थांबल्यास सर्व संघटना मिळून परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशारा शिक्षकांच्या वतीने देण्यात आला आहे. मागील वर्षी परीक्षा कालावधीमध्ये अनेक शिक्षकांवर हल्ले झाले. मात्र त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करण्यात आलेला नाही. सरमिसळ प्रकारामुळे दुसऱ्या सेंटरवर शिक्षक गेल्यामुळे शिक्षक, शिक्षकेतरवर हल्ले झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

काही तालुक्यांमध्ये वर्षभर नसलेले विद्यार्थी परीक्षेत कसे येतात?, कला–क्रीडा व इतर प्रस्ताव पुणे बोर्ड मध्ये न स्वीकारता प्रत्येक जिल्ह्याच्या वाटप केंद्रावर स्वीकारण्यात यावेत, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रोस्टर नाशिक विभाग मागासवर्गीय पक्षाकडून तपासले जात नाहीत त्यामुळे शालार्थ आयडी साठी रोस्टरची अट शिथिल करावी, केंद्र संचालकांची व स्टेशनरी क्लार्कची संवेदनशील केंद्रामधून बदल करू नये, पेपर तपासणीसाठी शाळेकडून शिक्षकांच्या अद्यावत याद्या घ्याव्या, प्रॅक्टिकलसाठी शिक्षकांची नावे व फोन नंबर जुनेच अपडेट न करता सदरचे नवीन याद्या अद्यावत करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

# जमा खर्चाचा ताळेबंद महापालिका आता दर महिन्याला करणार सादर

**मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली होत नसल्याने अत्यावश्यक खर्चातही २.६१ कोटींची होतेय तूट : प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती**

नगर – अहिल्यानगर शहरात महानगरपालिका अत्यावश्यक सेवांसह इतर सुविधा पुरवत आहे. वाढत्या नागरीकरणामुळे व लोकवस्ती विस्तारत असल्याने सेवा व सुविधांची मागणी वाढत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा दर महिन्याला अत्यावश्यक व बांधील खर्चही वाढला आहे. सद्यस्थितीत दरमहा अत्यावश्यक खर्च १८.९६ कोटींवर पोहचला आहे. त्या तुलनेत महानगरपालिकेला दरमहा जमा होणारे कमी आहे. त्यामुळे दर महिन्याला २.६१ कोटींची तूट निर्माण होऊन आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम नागरी सेवा, सुविधा यासह विकासकामांवर होत आहे. त्यामुळे नागरिकांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी नियमित भरावी, थकबाकीदारांनी १००% शास्ती सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

गेल्या २२ वर्षांपासून महानगरपालिकेने मालमत्ता कर व पाणीपट्टीत वाढ केलेली नाही. दुसरीकडे खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. महानगरपालिका ही उत्पन्न किंवा नफा कमावणारी संस्था नसली, तरी सेवा सुविधांवर होणार खर्च व उत्पन्न याचा समतोल राखण्यासाठी काही उपाययोजना महानगरपालिका करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पाणीपट्टी वाढवण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत नागरिकांना माहिती असणे गरजेचे आहे. या दृष्टीने दर महिन्याला महानगरपालिका जमा व खर्चाचा ताळेबंद आता नगरकरांसमोर मांडणार आहे. महानगरपालिकेत जीएसटी अनुदानातून १०.८५ कोटी व कर, शुल्काच्या माध्यमातून ५.५० कोटी अशी दरमहा सुमारे १६.३५ कोटींची रक्कम जमा होते. तर, अधिकारी, कर्मचारी पगारावर ८.४८ कोटी, निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर ४.३० कोटी, शिक्षण मंडळ पगार ३० लक्ष, पाणीपुरवठा वीज बिल ३ कोटी, पथदिवे वीजबिल ४० लक्ष, कर्मचारी मानधन २५ लक्ष, दिव्यांग मानधन २० लक्ष, कुष्ठरुग्ण मानधन २ लक्ष, पेट्रोल व डिझेल ७ लक्ष, नगरसेवक मानधन (थकीत) ८ लक्ष, मोबाईल, फोन बिल, झेरॉक्स, अग्रीम, वाहन खर्च ६ लक्ष, पाणीपुरवठा दुरुस्ती व औषधे १५ लक्ष, आऊटसोर्सिंग कर्मचारी ३० लक्ष, अशुद्ध पाणी आकार २० लक्ष, कोर्ट केसेस १० लक्ष, पुरवठादार व विकास कामे तातडीची देयके ५० लक्ष, टँकर, बससेवा व जनावरे पकडणे ३५ लक्ष, कर्मचारी वेतन आयोग फरक २० लक्ष असा दरमहा १८.९६ कोटींचा खर्च होत आहे. जमा व खर्चात २.६१ कोटींची दरमहा तूट निर्माण होत आहे. त्यामुळे आर्थिक अडचण निर्माण होत असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी निदर्शनास आणले आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात राज्य व केंद्र शासनाच्या निधीतून पाणीपुरवठा योजना, मलनिस्सारण योजना, सोलर प्रकल्प यासह कोट्यवधी रुपयांची रस्त्यांची कामे सुरू आहेत. यामध्ये महानगरपालिकेला ३० टक्के स्वहिस्सा भरावा लागत आहे. त्यासाठी लागणारा निधी हा विकास भार (२५ टक्के रक्कम), अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रीमियम, बांधकाम परवाना शुल्क व अशा इतर उत्पन्नातून भरण्याचा प्रयत्न महानगरपालिका करत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेला रस्त्यांच्या कामांसाठी, इतर योजना व प्रकल्पांसाठी सुमारे ७० ते ८० कोटी रुपयांचा स्वहिसा भरावा लागणार आहे. त्यामुळे महानगरपालिका उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करत आहे. नागरीक व मालमत्ताधारकांसमोर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती आम्ही मांडत आहोत. त्यामुळे खर्चातील तूट भरून काढण्यासाठी, नागरी सेवा, सुविधा सुरळीत राहाव्यात यासाठी कराची वसुली वाढणे गरजेचे आहे. नागरिकांनी, थकबाकीदार मालमत्ता धारकांनी शास्तीमध्ये दिलेल्या १००% सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा तत्काळ भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या 'नगर रचना'त 'मलिदा कर्मचारी गँग'

नगर – तपोवन रोड हॉटेल राजनंदिनी, एकविरा चौक ते पारिजात चौक, राजनंदिनी ते लेखानगर मार्गे, सरस्वती शाळा ते तलाठी कार्यालय ते बंधन लॉन ते नगर मनमाड रोडच्या माकींग व रोडचे काम चालू करण्याबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून आपणास व पालिका अधिकाऱ्यांशी अनेकदा पाठपुरावा करून देखील रस्त्याचे काम होत नाही. या कामासाठी आमदार संग्राम जगताप यांनी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला असून देखील सदरील काम चालू नाही. काम चालू नसल्याचे कारण ठेकेदाराला विचारल्यास आम्हाला रोड मार्किंग मिळाली नाही. रस्त्याची वर्क ऑर्डर होवून अनेक महिने गेले. तरी देखील अजुन रोड मार्कंग मिळत नाही. शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या प्रभागात डीपी रस्त्यांची कामे मंजूर असून ती मनपा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे प्रलंबित पडली आहे, ही रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर मॉडेल रस्ते म्हणून ओळखले जातील मात्र याचे सोयरसुतक या अधिकाऱ्यांना नाही, अशी भावना मनपा मा.विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी व्यक्त केली.



मनपा नगर रचना विभागाच्या भ्रष्ट कारभारासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना संपत बारस्कर. (छाया – लहू दळवी)

पुढे निवेदनात संपत बारस्कर यांनी म्हटले की मला असे वाटते नगररचना विभाग हा पूर्णपणे पैसे वसूलीच्या मागे आहे. महापालिकेत बांधकाम व्यावसायिक आला किंवा एखाद्याने घर बांधायला काढले. त्यांनी त्यांचे घर रूपया–रूपया गोळा करून एक किंवा अर्धा गुंठा जागा घेवून, आपल्या मुला बाळांना व आपला संसार उभा करणेसाठी कर्ज घेवून घरच्यांचे सोने गहाण ठेवून घर बांधतात हे नगररचना विभागातील लोक फक्त या लोकांकडून पैसे उकळण्यात व्यस्त आहेत. एकाच जागेवर अनेक वर्ष हे लोक काम कसे करतात. जरी बदली झाली की पुन्हा कसे परत लगेच येतात, हा मोठा प्रश्न आहे. या कामामुळे या अधिकाऱ्यांकडे शहर विकास कामासाठी वेळ नाही. कारण तेथे यांना मलिदा म्हणजेच पैसे भेटत नाही. अशा लोकांच्या तातडीने या विभागातून बदली करण्यात याव्यात. व सदरील प्रश्न जोपर्यंत मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलन चालूच राहणार असा इशारा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना संपत बारस्कर यांनी निवेदनातून दिला



माळीवाडा बस स्थानक येथे नागपूर ते शिर्डी स्व.वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे आगमन झाले असता या दिंडीचे स्वागत करताना पद्मश्री पोपटराव पवार. याप्रसंगी काकासाहेब कोयटे, सुरेश वाबळे, वसंत लोढा, गणेश पुरी, प्रशांत गायकवाड, किसनराव लोटके, उद्धवराव दुसुंगे आदी. या सहकार दिंडीत लेझीम पथक, सनई वादक, नगर जिल्ह्यातून आलेले सहकार दिंडीचे चित्ररथ, तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचा आकर्षक चित्ररथ सहभागी झाला होता.

# महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशाला सहकाराचा एक आदर्श निर्माण करुन दिला

**पोपटराव पवार यांचे प्रतिपादन, नागपूर ते शिर्डी सहकार दिंडीचे अहिल्यानगर येथे स्वागत**

नगर – सहकार हा महाराष्ट्राचा कणा आहे. सामाजिक,आर्थिक विषमता दूर करण्याचे खुप मोठे काम सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्रात घडले आहे. महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशाला सहकाराचा एक आदर्श निर्माण करुन दिला आहे. म्हणूनच स्वर्गीय वैकुंठाबाई मेहता यांना सहकाराचे जनक मानतात त्यांच्या विचारधारेने राजकीय, सामाजिक सहकाराची चळवळ उभी राहिली आहे. दिंडी एक प्रेरणा आहे महात्मा गांधींनी दांडी यात्रेच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली त्याचप्रमाणे सहकाराच्या दिंडी मुळे जनजागृती होईल, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले आहे.

माळीवाडा बस स्थानक येथे नागपूर ते शिर्डी स्व.वैकुंठभाई मेहता सहकार दिंडी चे आगमन झाले असता या दिंडीची स्वागत पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, राष्ट्रीय मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, जिल्हा उपनिबंधक गणेशपुरी जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, तालुका फेडरेशनचे अध्यक्ष किसनराव लोटके, राजीव गांधी पतसंस्थेचे संस्थापक उद्धवराव दुसुंगे, मराठा सेवा पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब काळे, रेणुका माता पतसंस्थेचे प्रशांत भालेराव, महात्मा फुले पतसंस्थेचे शरद झोडगे, जैन ओसवालचे किरण भंडारी, मार्कंडेय सहकारी पतसंस्थेचे चेअरमन नारायण कोडम, नगर तालुका उपनिबंधक डॉ. शुभांगी गोंड, बाळकृष्ण काळे, प्रशांत भालेराव, वासुदेव काळे, कडुभाऊ काळे, शशिवाजी कपाळे, वसंतराव कवाद, अजिनाथ हजारे, ज्ञानदेव पाचपुते, उमेश मोरगांवकर, दत्तात्रय गावडे, सौ.सुशिलाताई नवले, पुखराज पिपाडा, वाडकर सर, रवीकाका बोरावके, विठ्ठलराव अभंग, रमशे गायकवाड, नवनाथ आढाव, सौ. मिनल बोरा, व्हा. चेअरमन सौ. स्वाती गुंदेचा, अरुणा गोयल आदींसह अ.नगर महाराष्ट्र शासन सहकार विभाग आणि शहर व जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, स्व.वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे आगमन नागपूर येथून अहिल्यानगर येथे झाले आहे. महाराष्ट्रात पतसंस्था चळवळ रुजली आहे. पतसंस्थेबद्दलचा जनतेचा विश्वास वृद्धिंगत व्हावा हा विचार घेऊन सहकार दिंडी संपूर्ण महाराष्ट्रात जात आहे. या दिंडीचे अहिल्यानगर येथे स्वागत करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून पतसंस्था चळवळीला शासनाची बळकटी मिळावी. या हेतूने ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे.

या सहकार दिंडीत लेझीम पथक, सनई वादक, नगर जिल्ह्यातून आलेले सहकार दिंडीचे चित्ररथ, तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन चा आकर्षक चित्र रथ सहभागी झाला होता. सरकार दिंडीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा येथून सुरू झाली. यानंतर सहकार दिंडी माळीवाडा वेस, माणिक चौक, कापड बाजार, डाळ मंडई, आडते बाजार, बंगाल चौकी, मार्केट यार्ड येथे सहकार दिंडीचा समारोप करण्यात आला.

# 'कलर्स मराठी' च्या जय जय स्वामी समर्थ मालिकेत अहिल्यानगरमधील 'सायबर कॅफेवाल्याचा मुलगा'

**सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे पटकाविले रौप्यपदक**

नगर – इयत्ता सातवीमध्ये शिकणारा साईराज सरडे हा बालचित्रपट कलाकार कलर्स मराठी वाहिनीवरील जय जय स्वामी समर्थ या मालिकेच्या तब्बल २७ भागांमध्ये अभिनयाच्या माध्यमातून झळकत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने उत्कृष्ट अभिनयाबद्दल त्यास रौप्यपदक प्राप्त झाले आहे. स्वामी समर्थांच्या भूमिकेतील अक्षय मुडावदकर यांनी चि. साईराज याचा उत्कृष्ट अभिनयाबद्दल सत्कार केला आहे. येथील सावेडीमध्ये सायबर कॅफे चालवणाऱ्या अतुल सरडे यांचा मुलगा आहे.



साईराज सरडे

वक्तृत्व, अभिनय, कथाकथन, एकपात्री आदी विविध कलांमधून झळकणारा चि. साईराज हा बालचित्रपट कलाकार सोनी मराठी वाहिनीमधील गाथा नवनाथांची या धार्मिक मालिकेच्या सुमारे १८ भागांमध्ये देखील विविध पात्रांमधून झळकलेला आहे. नुकत्याच झालेल्या राज्य बालनाट्य स्पर्धेत सप्तरंग थिएटर्सच्या तेरा मेरा सपना या नाटकातील अभिनयासाठी शासनाचे गुणवत्ता प्रमाणपत्र देखील त्यास प्राप्त झाले आहे.

आकाशवाणीवरील मुलाखती, विविध कलांची सादरीकरणे प्रस्तुत करणारा चि. साईराज हा श्री गणेश प्रोडक्शनच्या ८७ रुपयांचा बॉलपेन या लघुपटासह उपरती, एक इच्छा अपुरी या लघुपटांच्या माध्यमातून अहिल्यानगरचे नाव राज्यपातळीवर झळकावत आहे. मैत्री कट्टा या सदरासाठी टीझर निर्मिती तसेच मोबाईल विकणे आहे व लोकमान्यांचा गणेशोत्सव या बालनाट्यांतील सहकार्य–सहभाग, वाचाल तर वाचाल सारखी लोकप्रिय झालेली नाट्यछटा अशा अनेक पातळ्यांवर हा बालकलाकार मराठी, हिंदी सिनेनाट्य क्षेत्रातील दिग्गज कलाकारांबरोबर काम करून नगरची रंगभूमी गाजवत आहे.

राज्य नाट्य स्पर्धेला जात असताना आईचा मृत्यू झाला. तिची आठवण दररोज येते. मुलाचे हे यश पहायला आई हवी होती.

मोठा कलाकार होण्याचे आईचे स्वप्न मी निश्चितच पूर्ण करेल. असे साईराज भावनिकपणे नमूद करतो.

# शिर्डीत गुन्हेगारांच्या मोठ्या टोळ्या; बंदोबस्तासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

नगर – वेगवेगळे अंमली पदार्थ तसेच व्यसनाधीनतेचे साहित्य पुरवुन तरुणांची व्यसनाधीन पिढी बनविण्याचे व गुन्हेगार बनविण्याचे काम चालु असुन त्यामुळे हे व्यसनाचे साहीत्य पुरविणारे व विकणारे यांच्यावर कारवाई व्हावी व शिर्डीतील गुन्हेगारांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत अशी भावना डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी व्यक्त केली.



शिर्डी येथे खुन झालेल्या साई संस्थानच्या कामगारांच्या कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन करताना डॉ.राजेंद्र पिपाडा समवेत दिलीपराव वाघमारे, निखील पिपाडा आदी.

शिर्डी येथे खुन झालेल्या साई संस्थानच्या कामगारांच्या कुटुंबियांची डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी भेट घेवुन सांत्वन केले. यावेळी दिलीपराव वाघमारे, निखील पिपाडा आदी उपस्थित होते. यावेळी याप्रकरणाचा पाठपुरावा करुन आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शिर्डीत सध्या व्यसन करुन गुन्हेगारी करण्याचे प्रमाण वाढले असुन असे प्रकार रोखण्याची गरज आहे. या गुन्हेगारी मुळे सामान्य लोकांचे बळी जात आहे. कामगारांचे खुन ही घटना संतापजनक आहे. शिर्डीत गुन्हेगारांच्या टोळ्या वाढल्या आहेत. त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

शिर्डीत येणारे साईभक्तही सुरक्षित नाहीत चैन स्नॅचिंग, पाकीटमारी या गोष्टीही थांबविणे गरजेचे आहे. आजची घटना अतिशय दुर्दैवी आहे. संस्थानमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे वेळापत्रकही बदलणे गरजेचे असुन रात्री काम करीत असलेल्या कामगारांना सकाळी ७ वाजे पर्यंतची वेळ ठेवुन पुढील शिफ्ट त्यानंतर सुरू केली पाहिजे. यासाठीही आपण लक्ष घालणार असल्याचे ते म्हणाले.

### सीसीटीव्ही फुटेज असूनही दुचाकी चोर पकडले जात नाहीत

सामान्य लोकांच्या मोटरसायकल चोरणाऱ्या चोरट्यांचाही सुळसुळाट मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. माझ्या घरासमोरुन ३ दुचाकी चोरीस गेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये अरोपी स्पष्ट दिसत असतानाही अद्यापपर्यंत आरोपी पकडले गेले नाही. सर्व पुरावे असतानाही दुचाकी चोरणारे आरोपी पकडले जात नाहीत हे अतिशय संताप जनक आहे. शिर्डीला दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या गाड्या रात्री रस्त्यावर लुटल्या जातात. त्यातीलही आरोपी पकडले जाणे गरजेचे आहे. तसेच दोन्ही खुनांची सीसीटीव्हितील वेळ ४ वाजुन ७ मिनिटे ते १२ मिनिटे अशी दिसत आहे. त्यामुळे एकच वेळ असल्याने आणखी दुसरे दोन आरोपी आहेत का हे पोलिसांनी पडताळुन पाहण्याची गरज आहे, असेही डॉ.पिपाडा यांनी म्हंटले आहे.

